दैनिक
जनता आवाज

अहिल्यानगर | वर्ष ०३ रे | अंक २१५ वा | गुरूवार, दि. १५ ऑक्टोबर २०२६ | RNI No. MAHMAR/2022/85155 | पाने ०८ | किंमत ४ रुपये

बँकवाल्यांना चपलेने झोडपा : वडेट्टीवार

नागपूर : एकीकडे दुष्काळाने होरपळलेल्या शेतकऱ्याच्या पोटात अन्नाचा दाणा नाही, शेतकऱ्यांच्या मुलांकडे कॉलेजची फी भरायला पैसे नाहीत; आणि दुसरीकडे मात्र खाल्लेले जिरवण्यासाठी पुण्यात सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तब्बल ७०० कोटी रुपयांची निविदा काढून पाथवे बांधला जात आहे. या राज्यात अंधेरी नगरी अन् चौपट राजा असा भोंगळ कारभार सुरू आहे. दुष्काळी भागात जर कोणी बँकवाला किंवा मायक्रो फायनान्स कंपनीचा माणूस वसुलीसाठी दारात आला आणि महिलांचे फोटो काढू लागला, तर त्याला तिथल्या तिथे चपलेने झोडपून काढा! मला थेट फोन करा, मी तुमच्या पाठीशी उभा राहीन, असा इशारा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी दिला आहे. नागपूर येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना वडेट्टीवार यांनी केंद्र व राज्य सरकारवर टिका केली.

आजचे हवामान
कमाल 34°C | किमान 17°C

पेट्रोल 111.21 | डिझेल 97.83

सोने 1,46,364 | चांदी 2,11,100

संमिश्र

होर्मुझमध्ये सुरुंगाला धडकून जहाज बुडाले

तेहराण : होर्मुझ सामुद्रधुनीत सुरुंगाला धडकून एक मालवाहू जहाज बुडाले. जहाजात २,५०० कंटेनर होते. इराणच्या रिव्होल्युशनरी गार्ड्सने बुधवारी ही माहिती दिली. युद्ध सुरू झाल्यानंतर प्रथमच इराणने एखादे जहाज सुरुंगाला धडकून बुडाल्याचे सांगितले आहे. सुरुंगाला धडकल्यानंतर जहाजाला आग लागली होती. सध्या जहाजाच्या क्रूबाबत कोणतीही माहिती समोर आलेली नाही. तेहराण सांगितले की, जहाज होर्मुझजवळ अशा मार्गावरून जात होते, ज्याचा वापर करण्याची परवानगी नव्हती आणि जो धोकादायक मानला जात होता. जहाजाचे नाव आणि ते कुठून कुठे जात होते, याची माहिती देण्यात आलेली नाही.

'त्या' मुस्कानला फाशीची शिक्षा

मेरठ : मेरठमध्ये प्रियकरासोबत मिळून पती सौरभ राजपूतची हत्या करणाऱ्या मुस्कानला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. तिचा प्रियकर साहिललाही न्यायालयाने फाशीची शिक्षा सुनावली. शिक्षा सुनावण्यापूर्वी तुरुंगात असलेल्या मुस्कान आणि साहिलला व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे जोडण्यात आले. मुस्कान रस्तोगी आणि साहिल ढसाढसा रडू लागले. न्यायाधीशांनी मुस्कानला विचारले- तू तुझा पती सौरभ राजपूतच्या हत्येप्रकरणी दोषी आहेस, तुला कोणती शिक्षा हवी आहे? तिने उत्तर दिले- माझ्या मुलींची काळजी घेतली जावी. त्यानंतर ती शांत झाली. यानंतर साहिलला हाच प्रश्न विचारण्यात आला, मात्र तो गप्प राहिला. शिक्षेची घोषणा झाल्यानंतर सौरभच्या आईला अश्रू अनावर झाले.

कॉकरोच पार्टीचे १६ला दिल्लीत आंदोलन

नवी दिल्ली : कॉकरोच जनता पार्टीचे अभिजीत दिपके यांनी १६ ऑक्टोबर रोजी आंदोलन करण्याची घोषणा केली आहे. बुधवारी जारी केलेल्या एका व्हिडिओ संदेशात, दिपके यांनी लोकांना १६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजता हातात तिरंगा घेऊन कनॉट प्लेस येथे जमण्याचे आवाहन केले. ते म्हणाले, ''ते कदाचित मला तुरुंगातही टाकतील, पण मला त्याची पर्वा नाही.'' दिपके बुधवारी दुपारी दिल्लीत दाखल झाले. विमानतळावरून बाहेर पडत असतानाच लोकांच्या जमावाने त्यांच्यावर ओरडायला सुरुवात केली.



दुष्काळाच्या संकटात बळीराजाला आधार

◆ राज्य सरकारकडून शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी ५ हजारांची मदत ◆ ३०५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर

जनता आवाज वृत्तसेवा

मुंबई : राज्यातील वाढत्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्य मंत्रिमंडळाने शेतकरी आणि दुष्काळग्रस्त जनतेला दिलासा देणारे महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. यापूर्वी दुष्काळ जाहीर केलेल्या २६५ तालुक्यांमध्ये आणखी ४० तालुक्यांची भर घालण्यात आल्याने आता राज्यातील ३०५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वीच ५ हजार रुपयांची आगाऊ मदत थेट बँक खात्यात देण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीनंतर संयुक्त पत्रकार परिषदेत या निर्णयांची माहिती देण्यात आली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील सदस्य यावेळी उपस्थित होते.

दुष्काळी मदतीची प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण होऊन प्रत्यक्ष निधी मिळण्यास वेळ लागतो. त्यामुळे शेतकऱ्यांना दिवाळीच्या काळात तातडीचा आधार मिळावा, यासाठी अंतिम दुष्काळी मदतीपैकी ५ हजार रुपये आगाऊ रक्कम थेट लाभ हस्तांतरणाद्वारे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली जाणार आहे. दरम्यान, शेतकरी कर्जमाफीची प्रक्रियाही सुरू असून नव्याने सुमारे साडेतीन लाख शेतकऱ्यांची यादी प्रमाणित करण्यात आली आहे.

मराठवाड्यातील अनेक भागांत भूजल पातळी मोठ्या प्रमाणात खालावली आहे. काही ठिकाणी निरीक्षण विहिरींमधील पाणीपातळी तीन मीटरपेक्षा अधिक खाली गेली आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्यासाठी काही भागांत ऑक्टोबरपासूनच टँकर सुरू करण्यात आले आहेत. टँकरच्या फेऱ्यांमध्ये पारदर्शकता राहावी यासाठी प्रत्येक टँकरला जीपीएस प्रणाली बंधनकारक करण्यात आली आहे.

चारा हमीभावाने खरेदी

शेती आणि पिण्याच्या पाण्याचे संरक्षण करण्यासाठी कालवे व धरणांमधून होणारा बेकायदेशीर पाणीउपसा रोखण्यासाठी १६ हजार अवैध उपसा जोडण्या तोडण्यात आल्या आहेत.

दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांच्या पाल्यांना शैक्षणिक आणि परीक्षा शुल्कमाफी देण्याचा तर तूद यापूर्वीपासून होती. मात्र, त्यातील जाचक अटींमुळे अनेक विद्यार्थ्यांना लाभ मिळत नव्हता. मंत्रिमंडळाने या अटी दूर करून दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना सरसकट शैक्षणिक व परीक्षा शुल्कमाफी देण्याचा निर्णय घेतला आहे.

विद्यार्थ्यांची सरसकट शुल्कमाफी

याशिवाय जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, विविध कार्यकारी सेवा सोसायट्या आणि पतसंस्थांनी सक्तीची कर्जवसुली करू नये, असे निर्देश देण्यात आले आहेत.

शेतकऱ्यांना साडेसात अश्वशक्तीपर्यंत मोफत वीज देण्यात येत असल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे. जुन्या वीज बिलांच्या वसुलीसाठी शेतकऱ्यांना त्रास देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे.

राज्यातील काही भागांत केवळ ९० दिवस पुरेल एवढाच, तर काही भागांत सहा ते सात महिने पुरेल इतका चारा उपलब्ध आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी रब्बी ज्वारी आणि चारा पिकांची लागवड करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला संपूर्ण चारा शासन हमीभावाने खरेदी करणार असल्याचेही सरकारने जाहीर केले आहे.

महाराष्ट्रातील पायाभूत सुविधा, सिंचन आणि विविध केंद्र पुरस्कृत योजनांसाठी केंद्र सरकारकडून मिळालेल्या सहकार्याचाही यावेळी उल्लेख करण्यात आला. महाराष्ट्रातील विविध विकास प्रकल्पांसह पीएम-कुसुम, पीएम आवास, आयुष्मान भारत, पीएम किसान आणि किसान क्रेडिट कार्ड यांसारख्या योजनांचा लाभ राज्याला झाल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

दुष्काळाच्या संकटात शेतकऱ्यांना तातडीचा आर्थिक आधार, पाणीपुरवठा, वीज, शिक्षण आणि पशुधनासाठी चाऱ्याची व्यवस्था करण्यावर सरकारने भर दिला असून, दिवाळीपूर्वी मिळणारी ५ हजारांची आगाऊ मदत शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा दिलासा ठरणार आहे.



मोदींच्या २५ वर्षांच्या सेवेचा गौरव

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घटनात्मक पदावर गुजरातचे मुख्यमंत्री ते भारताचे पंतप्रधान असा २५ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केल्याबद्दल राज्य मंत्रिमंडळाने अभिनंदनाचा ठराव मंजूर केला. देशसेवा, अंत्योदय आणि आत्मनिर्भर भारताच्या दिशेने केलेल्या कार्याचा ठरावात गौरव करण्यात आला.

३०५ तालुक्यांना दुष्काळी सवलती

राज्यात सुरुवातीला २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला होता. त्यानंतर ट्रिगर-१ आणि ट्रिगर-२ या शास्त्रीय निकषांच्या आधारे फेरआढावा घेण्यात आला. यात आणखी ४० तालुक्यांचा समावेश करण्यात आला असून, आता एकूण ३०५ तालुके दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आले आहेत. या तालुक्यांसाठी ऑक्टोबरमध्येच पूरक शासन निर्णय काढून दुष्काळातील १२ सवलती लागू करण्यात आल्या आहेत.

४४१५ शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीचा मार्ग मोकळा

अहिल्यानगरच्या शेतकऱ्यांना दिलासा; तिसरी यादी प्रसिद्ध

जनता आवाज वृत्तसेवा

अहिल्यानगर : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत लाभार्थी शेतकऱ्यांची तिसरी यादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीत अहिल्यानगर जिल्ह्यातील ४ हजार ४१५ शेतकऱ्यांचा समावेश आहे. यामध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या १ हजार ४७१, तर इतर बँकांमधील २ हजार ९४४ शेतकऱ्यांचा समावेश आहे.



योजनेच्या पहिल्या दोन याद्यांमध्ये जिल्ह्यातील १ लाख ४२ हजार ४४१ शेतकऱ्यांचा समावेश करण्यात आला होता. तिसऱ्या यादीसह आतापर्यंत एकूण १ लाख ४६ हजार ८५६ शेतकऱ्यांची आधार प्रमाणीकरणासाठी यादी उपलब्ध झाली आहे. त्यापैकी १ लाख ३३ हजार ५०५ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण केली आहे, अशी माहिती जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांनी दिली.

फार्मर आयडी काढून घ्या

ज्या शेतकऱ्यांनी अद्याप शेतकरी ओळख क्रमांक काढलेला नाही, त्यांनी तो तातडीने काढून घ्यावा. तसेच मृत खातेदारांच्या खात्यांच्या बाबतीत त्यांच्या वारसांनी संबंधित विकास संस्था किंवा बँकेकडे वारसाची नोंद करून घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया आणि जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांनी केले आहे.

आधार प्रमाणीकरणाचे आवाहन

राज्यातील ग्रामीण अर्थव्यवस्थेत शेतकऱ्यांचे महत्त्वाचे योगदान आहे. **(पान ४ वर)**

कंटेनरच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

राहुरीत हॉटेल सर्जाच्या समोरील घटना

जनता आवाज वृत्तसेवा

राहुरी : नगरमनमाड राज्य महामार्गावर राहुरी शहरातील हॉटेल सर्जाच्या समोर बुधवारी (दि.१४) सकाळी मोटारसायकल आणि कंटेनरचा भीषण अपघात झाला. या अपघातात मोटारसायकलस्वार आबासाहेब चांगदेव पठारे (वय ४४) यांचा जागीच मृत्यू झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, आबासाहेब पठारे हे कामानिमित्त मोटार सायकलवरून अहिल्यानगरकडे जात होते. बुधवारी सकाळी सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास ते राहुरी शहरातील हॉटेल सर्जाच्या समोरून जात असताना एका कंटेनरने त्यांच्या मोटारसायकलला जोराची धडक दिली. धडकेनंतर पठारे गंभीर जखमी झाले.

अपघाताची माहिती मिळताच रुग्णवाहिकेच्या मदतीने त्यांना तातडीने राहुरी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी केल्यानंतर उपचार सुरू करण्यापूर्वीच त्यांना मृत घोषित केले. शवविच्छेदनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मृतदेह नातेवाइकांच्या ताब्यात देण्यात आला.

दरम्यान, राहुरी पोलिसांनी अपघातातील कंटेनर ताब्यात घेतला असून, या प्रकरणाची नोंद राहुरी पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. **(पान ४ वर)**

शेतकऱ्यांना सौर ऊर्जेचा आधार

आ. विवेक कोल्हे; शहा प्रकल्प लवकरच कार्यान्वित

जनता आवाज वृत्तसेवा

कोपरगाव : शहा येथे २१.५० एकर क्षेत्रावर उभारण्यात आलेला ७ मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प लवकरच कार्यान्वित होणार आहे. शेतकऱ्यांच्या वीजविषयक अडचणी दूर करून शेतीपंपांना दिवसा अधिक सक्षम वीजपुरवठा मिळावा, यासाठी आ. विवेक कोल्हे यांनी विशेष पत्रव्यवहार करीत सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या या प्रयत्नांना यश आले असून, प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर चास उपकेंद्रांतर्गत येणाऱ्या सहा गावांतील शेतीपंप ग्राहकांना मोठा लाभ मिळणार आहे.



शहा येथील सौर ऊर्जा प्रकल्पातून ११ केव्ही वीजवाहिनीद्वारे **(पान ४ वर)**

चास उपकेंद्रावर ३,२८८ वीज ग्राहक

चास उपकेंद्रांतर्गत एकूण ३ हजार २८८ वीज ग्राहक आहेत. यामध्ये १ हजार ६०३ शेतीपंप ग्राहक, १ हजार ४९७ घरगुती ग्राहक, १३४ व्यापारी ग्राहक, २४ औद्योगिक ग्राहक आणि ३० इतर वीज ग्राहकांचा समावेश आहे. उपकेंद्राच्या कार्यक्षेत्रात शेतीपंप ग्राहकांची संख्या मोठी असल्याने सौर ऊर्जा प्रकल्पामुळे कृषी वीजपुरवठ्याच्या नियोजनाला मोठी मदत होणार आहे.

मराठा प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी संवाद कायम ठेवणार : विखे पाटील

आरक्षण, कुणबी प्रमाणपत्रे, शैक्षणिक सवलतींचा आढावा

जनता आवाज वृत्तसेवा

मुंबई : मराठा समाजाच्या विविध प्रश्नांवर शासन सकारात्मक असून, या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी मराठा संघटनांच्या पदाधिकाऱ्यांसोबत नियमित संवाद ठेवला जाईल, अशी ग्वाही जलसंपदा मंत्री तथा मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

मराठा समाजाच्या विविध संघटनांच्या प्रतिनिधींसोबत मुंबईत झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी मराठा आरक्षणासह कुणबी प्रमाणपत्रे, शैक्षणिक सवलती, उद्योजकता विकास योजना आणि विविध प्रलंबित प्रश्नांचा आढावा घेण्यात आला.



मराठा आरक्षण उपसमिती स्थापन झाल्यापासून आतापर्यंत १३ बैठका झाल्या असून, अध्यक्ष म्हणून १४ आढावा बैठका घेण्यात आल्या आहेत. अशा एकूण २७ बैठकांमधून मराठा समाजाशी संबंधित प्रश्नांचा सातत्याने आढावा घेण्यात येत असल्याचे विखे **(पान ४ वर)**

आरक्षणाची न्यायालयीन लढाई सुरू

मराठा समाजाच्या मागणीला प्रतिसाद देत २६ फेब्रुवारी २०२४ रोजी विशेष अधिवेशन घेऊन शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये १० टक्के आरक्षण देण्यात आले आहे. हे आरक्षण न्यायालयीन प्रक्रियेत टिकविण्यास शासनाला यश आले असून, पुढील सुनावणी २३ ऑक्टोबर २०२६ रोजी होणार आहे.

चोर चोर चोहिकडे, पोलीस गेले कोणीकडे?

जिल्ह्यात चोरी, घरफोडीच्या घटनांत वाढ; तपासाचा वेग मंदावल्याची नागरिकांची तक्रार

जनता आवाज वृत्तसेवा

अहिल्यानगर : जिल्ह्यात सध्या चोरी, घरफोडी आणि दरोड्याच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. चोर चोर चोहीकडे, पोलीस गेले कोणीकडे? असा सवाल उपस्थित करण्याची वेळ नागरिकांवर आली आहे. जिल्ह्यात घडलेल्या अनेक घरफोडी व दरोड्यांच्या गुन्ह्यांपैकी मोजक्याच गुन्ह्यांचा तपास लावण्यात पोलिसांना यश आले आहे. त्यातच नव्याने चोरीच्या घटना घडत असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.



चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढत आहे. घर बंद करून बाहेरगावी जाणाऱ्या कुटुंबांपासून ते रात्रीच्या वेळी घरात झोपणाऱ्या नागरिकांपर्यंत अनेकांना सुरक्षेची चिंता सतावत आहे. घरफोडी, दरोडे आणि इतर चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलिसांकडून प्रभावी उपाययोजना होणे आवश्यक आहे. मात्र, गुन्हे उघडकीस आणण्याच्या तपासाचा वेग कमी असल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे. **(पान ४ वर)**

गुन्हे उघडकीस आणण्याचे आव्हान

जिल्ह्यात घडणाऱ्या घरफोडी आणि दरोड्यांच्या गुन्ह्यांचा तपास वेगाने पूर्ण करण्याचे पोलिसांसमोर आव्हान आहे. प्रलंबित गुन्ह्यांचा नियमित आढावा घेऊन संशयितांचा शोध आणि चोरीस गेलेल्या मुद्देमालाची जप्ती करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे. गुन्हे उघडकीस येण्याचे प्रमाण वाढल्यास नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास अधिक दृढ होण्यास मदत होईल.

रात्रीची गस्त वाढविण्याची गरज

चोरीच्या घटना रोखण्यासाठी रात्रीच्या वेळी पोलिसांची गस्त प्रभावी असणे आवश्यक आहे. निवासी परिसर, बाजारपेठा आणि यापूर्वी चोरीच्या घटना घडलेल्या भागांत नियमित गस्त घालावी, अशी नागरिकांची अपेक्षा आहे. जिल्हा पोलीस अधीक्षकांनी गस्तीचे नियोजन, अंमलबजावणी आणि प्रलंबित गुन्ह्यांचा आढावा घेऊन आवश्यक त्या सूचना द्याव्यात, अशी मागणी होत आहे.

ग्राउंड ट्रूथिंग अहवाल सादर करा : आ. काळे

जनता आवाज वृत्तसेवा

कोळपेवाडी : कोपरगाव मतदारसंघात पावसाने प्रदीर्घ उघडीप दिल्यामुळे खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, वाढत्या उष्णतेमुळे जमिनीतील ओलावा कमी झाला आहे. विहिरी व कूपनलिकांची भूजलपातळीही खालावल्याने खरीप हंगामासह रब्बी हंगाम देखील संकटात आला आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने कोपरगाव मतदारसंघात ट्रिगर-२ लागू केला आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाच्या मदतीचा जास्तीत जास्त लाभ मिळवून देण्यासाठी महसूल व कृषी विभागाने तातडीने सर्वेक्षण करून ग्राउंड ट्रूथिंग अहवाल राज्य शासनाकडे सादर करावा, अशा सूचना आ. आशुतोष काळे यांनी दिल्या.



याबाबत आ. काळे यांनी तहसीलदार महेश सावंत आणि तालुका कृषी अधिकारी मनोज सोनवणे यांच्याशी चर्चा करून आवश्यक कार्यवाहीच्या सूचना दिल्या. कोपरगाव मतदारसंघात जवळपास अडीच **(पान ४ वर)**

जैन समाजाच्या विकासासाठी विखे परिवार कटिबद्ध

डॉ. सुजय विखे पाटील; निर्मळ पिंपरीत जैन समाजाच्या विहारधामाचे भूमिपूजन

जनता आवाज वृत्तसेवा

राहाता : विखे परिवार नेहमीच जैन समाजाच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील. जैन समाज आणि विखे परिवाराचे अनेक वर्षांपासून आपुलकीचे व विश्वासाचे नाते आहे. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली ग्रामपंचायतीने जैन समाजासाठी ही जमीन उपलब्ध करून दिली आहे. ही संघटना भविष्यातही अशीच पुढे घेऊन जा. मी आणि विखे परिवार सदैव तुमच्या पाठीशी राहू, असा विश्वास डॉ. सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केला.



निर्मळ पिंपरी येथे जैन समाजाच्या धार्मिक कार्यासाठी, साधू-साध्वींच्या विहारादरम्यान निवास व विश्रांतीसाठी तसेच आध्यात्मिक उन्नतीच्या उद्देशाने श्री श्वेतांबर जैन श्रावक संघ ट्रस्टच्या वतीने उभारण्यात येणाऱ्या भव्य विहारधामाचे भूमिपूजन डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. यावेळी ते बोलत होते.

पिंपरी-निर्मळ परिसरातून साधू-साध्वींचा विहार होत असताना त्यांच्या निवास व विश्रांतीची योग्य व्यवस्था व्हावी, यासाठी स्वतंत्र विहारधाम उभारण्याची जैन समाजाची अनेक वर्षांपासून मागणी होती. या मागणीची पूर्तता करण्यासाठी सहा महिन्यांपूर्वी स्थानिक युवकांनी एकत्र येत श्री श्वेतांबर जैन श्रावक संघ ट्रस्टची स्थापना केली.

राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि डॉ. सुजय विखे पाटील यांच्या सहकार्य व मार्गदर्शनातून निर्मळ पिंपरी ग्रामपंचायतीने या धार्मिक कार्यासाठी विनामूल्य जमीन उपलब्ध करून दिली. या कार्यासाठी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्रामस्थांचे सहकार्य लाभल्याबद्दल ट्रस्टच्या वतीने त्यांचे आभार मानण्यात आले.

दिग्गज मान्यवरांची होती उपस्थिती

राजेश भन्साळी, शैलेश सोळंकी, प्रफुल पिपाडा, प्रवीण रुणवाल, खुशालचंद रायसोनी, श्रणीक रुणवाल, नरेंद्र मुनावत, हेमंत मुथा, प्रवीण डुंगरवाल, मनोज पिपाडा, पारस धाडीवाल, नगराध्यक्ष स्वाधीन गाडेकर, विश्वनाथ निर्मळ, महेश वाघे, पोखरलाल लोढा, दिलीप भाटिया, राजेंद्र गादिया, राहुल कटारिया, अजित कुंकलोळ, उत्तमचंद सारनोत, श्रावक चोरडिया, हिरालाल सोलंकी, रमणलाल रुणवाल, इंद्रचन मुनावत, अजित धाडीवाल, ललित धाडीवाल, संजय पिपाडा, नंदलाल सोलंकी, नंदकुमार डुंगरवाल उपस्थित होते.

याप्रसंगी प्रफुल पिपाडा, प्रवीण रुणवाल व शैलेश सोळंकी यांनी मनोगत व्यक्त केले. राधाकृष्ण विखे पाटील यांचे आशीर्वाद आणि डॉ. सुजय विखे पाटील यांची भक्कम साथ समाजाच्या पाठीशी असल्याचे त्यांनी सांगितले. जैन समाजाच्या सेवेसाठी ट्रस्ट कटिबद्ध असून, समाजातील कोणत्याही बांधवावर संकट किंवा आपत्ती आल्यास मदतीसाठी तत्पर राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बुऱ्हाणनगरमध्ये आदिशक्ती महाआरोग्य शिबिर

जनता आवाज वृत्तसेवा

अहिल्यानगर : रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रल व रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर डिग्निटी यांच्या संयुक्त विद्यमाने बुऱ्हाणनगर देवी, बुऱ्हाणनगर येथे ११ ते १८ ऑक्टोबरदरम्यान सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत आदिशक्ती मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचा शुभारंभ उत्साहात झाला.

डीवायएसपी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उद्घाटन कार्यक्रमास प्रांत संघचालक नाना जाधव, हनुमंतराव पाटील, पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात, शिरीष रायते, डॉ. प्रकाश गरुड, डॉ. प्रकाश कांकरीया, डॉ. सुधा कांकरीया, ॲड. अभिषेक भगत, डॉ. वैशाली पाटील, अमर गुरप, सुनील मुथा, डॉ. कुणाल कोल्हे, राहुल जामगावकर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर डिग्निटीचे अध्यक्ष ॲड. अभिषेक भगत यांच्या प्रास्ताविकाने झाली. अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांनी मनोगत व्यक्त करून शिबिरास शुभेच्छा दिल्या.

या महाआरोग्य शिबिरात मोफत दंत तपासणी, नेत्र तपासणी, कर्करोग तपासणी, रक्तदाब, रक्तातील साखर तपासणी, आयुष्मान भारत आरोग्य कार्ड तसेच रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांनी आधार
प्रमाणीकरण करावे : घोडेचोर

जनता आवाज वृत्तसेवा

सोनई : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत पात्र लाभार्थी शेतकऱ्यांची तिसरी यादी सहकार विभागाकडून प्रसिद्ध करण्यात आली आहे. या यादीत राज्यातील ३ लाख ५१ हजार शेतकऱ्यांचा समावेश असून, आतापर्यंत एकूण २४ लाख ६७ हजार लाभार्थी शेतकरी कर्जमाफीच्या यादीत समाविष्ट झाले आहेत. नेवासा तालुक्यातील पात्र लाभार्थी शेतकऱ्यांनी तातडीने आधार प्रमाणीकरण करून कर्जमाफीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहाय्यक निबंधक देविदास घोडेचोर यांनी केले.

आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पात्र शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यावर कर्जमुक्तीची रक्कम जमा करण्यात येणार आहे. त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांनी आपले आधार प्रमाणीकरण प्रलंबित ठेवू नये, असे घोडेचोर यांनी सांगितले.

कर्जमाफी योजनेबाबत अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत माहिती पोहोचावी यासाठी सेवा संस्थांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील ग्रामपंचायती तसेच सार्वजनिक ठिकाणी कर्जमाफीसाठी पात्र लाभार्थी शेतकऱ्यांच्या याद्या प्रसिद्ध कराव्यात, असे आवाहनही सहायक निबंधक घोडेचोर यांनी केले आहे.

दरम्यान, या योजनेतील पात्र लाभार्थ्यांमध्ये मयत झालेल्या शेतकऱ्यांसह वयोवृद्ध तसेच बोटांच्या ठशांची नोंद होत नसलेल्या लाभार्थ्यांचाही समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे अशा पात्र लाभार्थ्यांनाही नियमानुसार कर्जमुक्तीचा लाभ मिळणार असल्याचे सहकार विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

पारंपरिक ज्ञान स्पर्धेत शिवतेज विद्यालयाचा डंका

प्रथम व तृतीय क्रमांकावर मोहोर; रानभाज्या व औषधी वनस्पतींच्या अभ्यासातून मिळविले यश

जनता आवाज वृत्तसेवा

पाथर्डी : ग्रामीण भागातील पारंपरिक ज्ञान, स्थानिक रानभाज्या तसेच जनावरांसाठी उपयुक्त औषधी वनस्पतींचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या पारंपरिक ज्ञान स्पर्धेत मढी येथील शिवतेज विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. नवरोजी गोदरेज सेंटर फॉर रिसर्च, शिरवळ (सातारा) यांच्या वतीने आयोजित या स्पर्धेत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी प्रथम आणि तृतीय क्रमांक पटकावला.

तालुक्यातील अनेक शाळांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. स्पर्धेसाठी परिसरात आढळणाऱ्या रानभाज्या आणि जनावरांच्या औषधी वनस्पती असे दोन विषय निश्चित करण्यात आले होते. शिवतेज विद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या सहा गटांनी स्पर्धेत सहभाग घेतला. त्यापैकी अनुज गणेश मरकड व केतन दशरथ मरकड यांच्या गटाने प्रथम क्रमांक, तर पूजा गणेश कुटे व आदिती मनोहर मरकड यांच्या गटाने तृतीय क्रमांक मिळविला.



विद्यार्थ्यांनी परिसरातील स्थानिक वनस्पतींचे महत्त्व, त्यांचे उपयोग तसेच पिढ्यान्पिढ्या जतन होत आलेल्या पारंपरिक ज्ञानाचा अभ्यास करून त्याचे सादरीकरण केले. त्यांच्या अभ्यासपूर्ण मांडणीला परीक्षकांनी दाद दिली.

या उपक्रमात नवरोजी गोदरेज सेंटर फॉर रिसर्चच्या वतीने डॉ. एराच भरुचा, डॉ. क्रांती यार्डी, अर्चना कल्याणी, प्रतीक प्रल्हाद देसाई, ज्योती भोये आणि शौनक देशपांडे यांनी सहभाग घेतला. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून पारंपरिक ज्ञानाचे महत्त्व पटवून दिले.

या प्रकल्पाच्या माध्यमातून ग्रामीण विद्यार्थ्यांना परिसरात उपलब्ध असलेल्या पौष्टिक रानभाज्या, पालेभाज्या, फळे आणि औषधी वनस्पतींची माहिती मिळाली. त्याचबरोबर जंक फूड व फास्ट फूडच्या अतिसेवनामुळे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम आणि विविध आजारांचा धोका याबाबतही विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक गौतम ढेकणे यांच्यासह बाळासाहेब मरकड, गणेश मरकड, दशरथ मरकड आणि रुक्मिणी चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. धनंजय मुखेकर आणि सचिव वंदना मुखेकर यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

पाणीप्रश्नावर फार्म गोल्ड शेतकरी गट मैदानात

जनता आवाज वृत्तसेवा

श्रीरामपूर : महांकाळ वाडगाव परिसरात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीमुळे शेती, पशुधन तसेच शेतीशी निगडित विविध व्यवसाय पाण्याअभावी अडचणीत आले आहेत. भविष्यातील पाणीटंचाईवर मात करण्याबरोबरच गावातील भूजलपातळी वाढविण्यासाठी फार्म गोल्ड शेतकरी गटाने जलसंधारणाच्या कामासाठी पुढाकार घेतला आहे.

गावातील पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी कोणत्या उपाययोजना करता येतील, तसेच भविष्यातील पाणीटंचाईला प्रभावीपणे कसे सामोरे जाता येईल, याबाबत फार्म गोल्ड शेतकरी गटाचे सदस्य आणि संबंधित अधिकाऱ्यांमध्ये सकारात्मक चर्चा झाली. यावेळी गावातील नाला, ओढा तसेच पाण्याचा साठा होऊ शकणाऱ्या अन्य योग्य ठिकाणी जलसंधारणाची कामे करण्याबाबत अधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत आवश्यक कामे करण्याचे आश्वासन दिले.

गावातील सर्व शेतकरी, आजी-माजी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सर्वपक्षीय कार्यकर्ते आणि युवा तरुणांनी राजकीय मतभेद बाजूला ठेवून गावाच्या पाण्याच्या प्रश्नासाठी एकत्र यावे. तसेच जलसंधारणाच्या कामात सक्रिय सहभाग नोंदवून सहकार्य करावे, असे आवाहनही पवार यांनी केले.

> पाण्याअभावी शेतीचे मोठे नुकसान होत असून पशुधनाचे संगोपन आणि शेतीशी संबंधित व्यवसायांवरही त्याचा परिणाम होत आहे. त्यामुळे पावसाचे पाणी अडविणे, ते जमिनीत मुरविणे आणि उपलब्ध जलस्रोतांचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. जलसंधारणाची कामे प्रभावीपणे राबविण्यासाठी ग्रामस्थांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे.
>
> **– रविंद्र पवार**

लोक सहभागातून जलसंधारणाची कामे उभी राहिल्यास गावातील पाणीटंचाई दूर करण्यासोबतच शेती आणि पशुधनाला मोठा आधार मिळू शकतो. त्यामुळे या उपक्रमाला सर्वांनी सहकार्य करून गावाच्या पाणीप्रश्नावर कायमस्वरूपी उपाय शोधण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

यावेळी फार्म गोल्ड शेतकरी गटाचे सचिव रवींद्र पवार यांच्यासह संदीप सांगळे, संजय मापारी, सोपान पवार, वसंत पवार, प्रशांत खुरुद, हरी पवार, भागवत पांढरे आणि देविदास सांगळे उपस्थित होते.

विकासाचा आराखडा नागरिकाभिमुख करा

रस्ते, पाणी अन् मलनिस्सारण; विकास आराखड्यात सर्वांचा समावेश करा

जनता आवाज वृत्तसेवा

अहिल्यानगर : शहराचा नियोजनबद्ध आणि भविष्यातील गरजा लक्षात घेऊन विकास करण्यासाठी प्रस्तावित विकास आराखड्यात मूलभूत सुविधांचा समावेश करणे आवश्यक आहे. रस्ते, पाणीपुरवठा, मलनिस्सारण, पूरपाणी निचरा, हरित पट्टा तसेच भविष्यातील नागरी विस्ताराचा विचार करून आराखडा तयार करावा, अशी मागणी आर्किटेक्ट, इंजिनिअर्स अँड सर्व्हेयर्स असोसिएशनने केली आहे.

ऐसा असोसिएशन आणि पोलाद स्टील यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थेच्या सभासदांसाठी शहराच्या विकास आराखड्याबाबत चर्चा सत्र व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. पुणे येथील नगर नियोजन, टाउनशिप मंजुरी, लेआउट, बिगरशेती प्रक्रिया आणि विकास आराखड्याचा अनुभव असलेले इंजिनिअर सचिन फुंदे यांनी यावेळी मार्गदर्शन केले.



इंजि. फुंदे यांनी विकास आराखडा तयार करण्याची प्रक्रिया, त्याची आवश्यकता आणि अंतिम मंजुरीपर्यंतच्या विविध टप्प्यांची माहिती दिली. भविष्यातील लोकसंख्या वाढ, रस्त्यांची रुंदी, गटार व्यवस्था, पाणीपुरवठा आणि नागरिकांना आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांचा विचार करून विकास आराखडा तयार करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

शहराच्या विकासात अडथळा ठरणाऱ्या सीना नदीच्या पूर नियंत्रण रेषा, लष्करी विभागाच्या संरक्षण भिंतीपासूनचे अंतर आणि इमारतींच्या उंचीवरील निर्बंध यांचाही विकास आराखडा तयार करताना तांत्रिकदृष्ट्या विचार करणे आवश्यक असल्याचे कार्यशाळेत नमूद करण्यात आले.

सीना नदीच्या काठावरील रेड व ब्लू पूर नियंत्रण रेषांच्या क्षेत्रात बांधकामांवर निर्बंध असताना त्या भागात प्रस्तावित रहिवास क्षेत्र दर्शविण्यात आल्याचा मुद्दा असोसिएशनने उपस्थित केला.

नेवासा खुर्दच्या बिरोबा
नवरात्रोत्सवाचे दहावे वर्ष उत्साहात

जनता आवाज वृत्तसेवा

नेवासा : नेवासा खुर्द येथील कॉलेज परिसरातील बिरोबा मंदिराशेजारील प्रांगणात बिरोबा नवरात्र उत्सव मंडळाच्या वतीने साजरे केले जात आहे. दशम वर्षपूर्तीनिमित्त मंडळाने विविध धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले असून, परिसरात उत्सवाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरवर्षीच्या परंपरेनुसार यंदाही रांजणगाव देवी येथून पवित्र ज्योत आणण्यात आली आहे. उत्सवकाळात धार्मिक कथा, गुणदर्शन कार्यक्रम, गरजूंसाठी आरोग्य शिबिर, महिलांसाठी विशेष उपक्रम, हरिपाठ आणि कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे.

उत्सवांतर्गत १७ ऑक्टोबर रोजी महिलांसाठी खेळ पैठणीचा हा मनोरंजनात्मक कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमात महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मंडळाने केले आहे.

मंडळाचे अध्यक्ष ग्रामसेवक ज्ञानदेव शिंदे, उपाध्यक्ष निलेश देहडराय, खजिनदार सुनील शिंदे, गोपीनाथ माकोणे तसेच मार्गदर्शक सुहास टेमक यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेत आहेत. नेवासा खुर्द व परिसरातील भाविकांनी विविध कार्यक्रमांना उपस्थित राहावे, असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

'एसएसजीएम'मध्ये मातापालक मेळावा उत्साहात



जनता आवाज वृत्तसेवा

कोपरगाव : रयत शिक्षण संस्थेच्या श्री सद्गुरू गंगागीर महाराज सायन्स, गौतम आर्ट्स अँड संजीवनी कॉमर्स महाविद्यालयातील कनिष्ठ महाविद्यालयात मातापालक मेळावा उत्साहात संपन्न झाला. प्राचार्य डॉ. माधव सरोदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या मेळाव्यास पालक, विद्यार्थी आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रभारी उपप्राचार्य रवींद्र हिंगे, पर्यवेक्षक माधव रेवगडे, विज्ञान विभागप्रमुख अण्णासाहेब गोराणे तसेच कला विभागप्रमुख कलावती देशमुख उपस्थित होते. त्यांनी महाविद्यालयात राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली. तसेच विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या विविध संधी, प्रशिक्षण आणि शैक्षणिक सुविधांबाबत पालकांना मार्गदर्शन केले.

प्रमुख मार्गदर्शक डॉ. अर्जुन भागवत यांनी बदलत्या काळानुसार शिक्षण व्यवस्थेतही मोठे बदल होत असल्याचे सांगितले. या बदलांचा स्वीकार करून विद्यार्थ्यांनी आधुनिक शिक्षणपद्धती, कौशल्याधारित शिक्षण आणि उपलब्ध संधींचा योग्य उपयोग करून घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी मातापालक प्रतिनिधी कुंदा जाधव, कविता मराठे आणि चंद्राविकास गव्हाणे यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसंदर्भात त्यांनी विविध सूचना व अपेक्षा मांडल्या. पालक, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील समन्वयातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला अधिक प्रभावी दिशा मिळू शकते, असा सूर त्यांच्या मनोगतातून व्यक्त झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षक माधव रेवगडे यांनी केले. सूत्रसंचालन सुनिता आत्रे यांनी केले.

> विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचा सहभाग आणि विद्यार्थ्यांची मेहनत या तिन्ही घटकांचा समन्वय महत्त्वाचा आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीचे आणि क्षमतेचे क्षेत्र ओळखून त्यामध्ये करिअर घडवावे.
>
> **– डॉ. माधव सरोदे, प्राचार्य**

पशुधन वाचवण्यासाठी ऊस चारा राखीव ठेवा

वीर वडार एकता फाउंडेशनची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडे मागणी

जनता आवाज वृत्तसेवा

अहिल्यानगर : दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पशुधन वाचवण्यासाठी राज्यातील उपलब्ध ऊस चारा म्हणून राखीव ठेवावा, तसेच ऊस उत्पादक शेतकऱ्यांना योग्य मोबदला देऊन ऊसतोडीचे नियोजन करावे, अशी मागणी वीर वडार एकता फाउंडेशनचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष मारुती विटेकर यांनी केली आहे. याबाबत त्यांनी मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन निवेदन दिले. यावेळी शेतकरी व कार्यकर्ते उपस्थित होते.



निवेदनात विटेकर यांनी म्हटले आहे की, अल निनोच्या प्रभावामुळे २०२६ मध्ये दुष्काळाची परिस्थिती निर्माण होण्याचा इशारा देण्यात आला असतानाही दुष्काळाच्या संभाव्य परिणामांचा सामना करण्यासाठी पुरेशा उपाययोजना झालेल्या दिसत नाहीत. त्यातच पशुधनासाठी परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. दूध उत्पादकांना सध्या प्रतिलिटर सुमारे ३८ ते ४२ रुपये दर मिळत असताना दूध उत्पादनाचा खर्च जवळपास ५० रुपये प्रतिलिटरपर्यंत पोहोचला आहे. पशुखाद्याच्या दरात सातत्याने वाढ होत असल्याने पशुपालक आर्थिक संकटात सापडले आहेत.

> साखर कारखाने सुरू झाल्यानंतर मोठ्या क्षमतेच्या यंत्रांद्वारे दररोज मोठ्या प्रमाणावर ऊसतोड केली जाते. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत पशुधनासाठी आवश्यक ऊस चारा उपलब्ध राहावा, यासाठी ऊसतोडीवर आवश्यक ते नियंत्रण ठेवून काही प्रमाणात ऊस चारा म्हणून राखीव ठेवण्याचा निर्णय युद्धपातळीवर घ्यावा. त्यासाठी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या उसाचा योग्य मोबदला देऊन राखीव ऊसाची व्यवस्था करावी.
>
> **– मारुती विटेकर**

जिल्ह्यासह राज्यातील अनेक भागांत दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने हिरवा व कोरडा चारा उपलब्ध होणे कठीण झाले आहे. चारा पिकांसाठीही पुरेसे पाणी उपलब्ध नसल्याने आगामी काळात पशुधन जगवण्यासाठी उसावर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहावे लागण्याची शक्यता आहे.

मतदारांच्या हक्कांसाठी रिपाइंचा एल्गार

जनता आवाज वृत्तसेवा

अहिल्यानगर : मतदारांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांनी राजीनामा द्यावा, त्यांच्यावर कठोर कारवाई करावी तसेच विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण प्रक्रिया रद्द करावी, या मागण्यांसाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई)च्या वतीने सुरू करण्यात आलेले साखळी उपोषण पाचव्या दिवशीही सुरूच राहिले. मार्केटयार्ड चौकातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर मंगळवारी आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी करत एसआयआरविरोधात आपली भूमिका मांडली.

दिवसभर सुरू असलेल्या या आंदोलनाचा आवाज रात्रीदेखील घुमत राहिला. पोवाडे, देशभक्तीपर गीते आणि स्फूर्तिगीतांच्या माध्यमातून आंदोलकांनी नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. घोषणाबाजीमुळे मार्केटयार्ड चौकाचा परिसर दणाणून गेला होता. मतदार यादीतील कथित त्रुटी आणि पात्र मतदारांची नावे वगळली जाण्याच्या शक्यतेवरून रिपाइंच्या वतीने हे आंदोलन सुरू करण्यात आले आहे.



या साखळी उपोषणात रिपाइंचे शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के, गुलाम शेख, विजय शिरसाठ, अजीम खान, नईम शेख, विल्सन रुकडीकर, स्वप्नील साठे, राहुल ठोकळ, अझीझ शेख, शुभम दारकुंडे, जालिंदर कानडे, लकी वाघमारे, अरबाज शेख, जमीर सय्यद, जावेद शेख यांच्यासह अनेक कार्यकर्ते सहभागी झाले.

दुष्काळात सरकारकडून मदतीची अपेक्षा : थोरात

थोरात कारखान्याचा ६० वा गळीत हंगाम शुभारंभ

जनता आवाज वृत्तसेवा

संगमनेर : यावर्षी राज्यात दुष्काळाची परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. कारखान्याची संख्या वाढली असून प्रत्येक कारखान्याने आपली क्षमता वाढविली आहे. ग्रामीण भागात आर्थिक समृद्धी निर्माण करणारी साखर कारखानदारी अडचणीत आली आहे. ग्रामीण भागात पिण्याचे पाणी, चारा हे सर्व प्रश्न असून अशा गंभीर दुष्काळी परिस्थितीमध्ये सरकारने तातडीने निर्णय करून साखर कारखानदारीसह शेतकरी, शेतमजूर महिला व सर्वसामान्य नागरिकांना मदत करावी, अशी अपेक्षा काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते राज्याचे माजी कृषी व महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केली आहे.



सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या ६० व्या गळीत हंगाम शुभारंभ प्रसंगी कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी आ. डॉ. सुधीर तांबे, कांचनताई थोरात, दुर्गाताई तांबे, कारखान्याचे व्हा.चेअरमन पांडुरंग पाटील घुले, ॲड. माधवराव कानवडे, गणपतराव सांगळे, बाबा ओहोळ, रणजीतसिंह देशमुख, डॉ. जयश्रीताई थोरात, सुधाकर जोशी, शंकरराव खेमनर, संपतराव डोंगरे, इंद्रजीत थोरात, शरद नाना थोरात, रामहरी कातोरे, हौशीराम सोनवणे, संचालक मंडळ उपस्थित होते.थोरात म्हणाले की, राज्यामध्ये कारखान्यांची संख्या वाढली आहे. कमी दिवसांमध्ये जास्त गाळप करण्याकरता कारखान्यांनी आपली क्षमता वाढवली आहे. दिवसेंदिवस उसाचे प्रमाण कमी होत चालले आहे. कारखान्यांमध्ये उसाची जीवघेणी स्पर्धा निर्माण झाली आहे. कारखानदारी अडचणीत आली आहे.

थोरात कारखान्याने कायम सभासद, शेतकरी, ऊस उत्पादक, कामगार यांचे हित जोपासले आहे. कार्यक्षेत्रात व बाहेरील सर्व शेतकरी, ऊस उत्पादक यांचा मोठा विश्वास संपादन केला असून त्यांच्या जीवनात आनंद निर्माण केला आहे. थोरात कारखान्याचे ९ हजार मे. टन क्षमतेच्या विस्तारीकरणाचे करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. अवघड परिस्थिती ही यावर्षी ११ लाख मे.टन गाळपाचे उद्दिष्ट आहे. यावर्षीचा दुष्काळ हा कोरोनाप्रमाणे संकट असून काटकसर, मेहनत, यामधून मार्ग काढत सर्वांची दिवाळी आनंदात करणार आहोत.

कार्यक्षेत्रामध्ये हक्काचा ऊस वाढवणे अत्यंत गरजेचे आहे. कारखान्याकडून ऊस उत्पादकांना यावर्षीही चांगला भाव मिळणार असून कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादकांना २०० रुपयांचे अनुदान दिले जाणार आहे. कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर यांनीही मनोगत व्यक्त केले.

दिवाळीनिमित्त कामगारांना २० टक्के बोनस

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याने कायम सभासद ,ऊस उत्पादक, शेतकरी व कामगार यांच्या जीवनामध्ये आनंद निर्माण केला असून दरवर्षीप्रमाणे दिवाळीनिमित्त यावर्षीही कामगारांना २० टक्के बोनस व ३० दिवसांचे अनुग्रह अनुदान दिले जाणार असल्याची घोषणा माजी कृषी व महसूल मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी यावेळी केली.

‘...त्या’ व्यावसायिकांची दुकाने बंद करा

सरपंच संजय मरकड यांचे ट्रस्टला निवेदन

जनता आवाज वृत्तसेवा

पाथर्डी : श्रीक्षेत्र मढी येथील श्री कानिफनाथ देवस्थान ट्रस्टच्या मालकीच्या जागेवरील ‘त्या’ समाजातील व्यावसायिकांची दुकाने बंद करण्याची मागणी मढीचे सरपंच संजय बाजीराव मरकड यांनी निवेदनाद्वारे केली आहे. संबंधित दुकाने बंद न केल्यास सकल हिंदू समाजाच्या वतीने अहिल्यानगर येथील धर्मादाय उपायुक्त कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. या निवेदनामुळे मढी येथील धार्मिक स्थळाच्या परिसरातील व्यावसायिकांच्या प्रश्नावरून पुन्हा एकदा वाद निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.



सरपंच संजय मरकड यांनी श्री कानिफनाथ देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष, व्यवस्थापक व विश्वस्त मंडळ यांना निवेदन देऊन संबंधित दुकाने बंद करण्याची मागणी केली आहे. या निवेदनाची प्रत अहिल्यानगर येथील धर्मादाय उपायुक्तांनाही माहितीसाठी देण्यात आली आहे. त्यामुळे हा प्रश्न केवळ देवस्थान ट्रस्टपुरता मर्यादित न राहता धर्मादाय प्रशासनाच्या स्तरावरही चर्चेत येण्याची शक्यता आहे.

देवस्थान ट्रस्टच्या मालकीच्या परिसरातील काही गाळ्यांमध्ये ‘त्या’ समाजातील व्यावसायिक व्यवसाय करीत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. संबंधित दुकानांचे भाडेकरार संपले असल्याचा दावा सरपंच मरकड यांनी केला आहे.

तसेच काही व्यावसायिकांकडून मांसाहार, प्रसाद विक्री आणि गुटखा, पेट्रोल व डिझेल यांसारख्या पदार्थांच्या विक्रीबाबत त्यांनी आक्षेप नोंदविले आहेत. या प्रकारांमुळे नाथभक्तांमध्ये असंतोष असल्याचेही निवेदनात म्हटले आहे. मढी येथे यापूर्वीही ‘त्या’ समाजातील व्यावसायिकांना यात्रेत दुकाने लावण्यास विरोध केल्याने हा मुद्दा चर्चेत आला होता.

दुकाने बंद करण्यासाठी सरपंच मरकड यांनी ट्रस्टला १५ दिवसांची मुदत दिली आहे. २८ ऑक्टोबर पर्यंत मागणी मान्य न झाल्यास सकल हिंदू समाजाच्या वतीने धर्मादाय उपायुक्त कार्यालय, अहिल्यानगर येथे आमरण उपोषण करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. त्यामुळे देवस्थान ट्रस्ट या मागणीवर काय भूमिका घेते आणि प्रशासनाकडून यासंदर्भात कोणती कार्यवाही होते, याकडे लक्ष लागले आहे.

कर्जमाफी की थट्टा; शेतकऱ्यांमध्ये संताप

तिसऱ्या यादीत अवघ्या एकाचे नाव

जनता आवाज वृत्तसेवा

अकोले : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत बहुप्रतीक्षित तिसरी यादी सोमवारी जाहीर करण्यात आली आहे. मात्र यामध्ये कोतुळ सेवा संस्थेच्या अवघ्या एकाच शेतकऱ्याचे नावे यादीत समाविष्ट झाल्याने इतर शेतकऱ्यांची घोर निराशा झाली आहे.



अकोले तालुक्यातील कोतुळ आदिवासी सेवासोसायटी तालुक्यातील मोठी संस्था आहे संस्थेने अल्प, मध्यम व दीर्घ मुदतीचे असे सुमारे ९ कोटी पेक्षा अधिक रुपयांचे कर्ज वितरण केले आहे. सभासद व कर्ज वितरणात अव्वल आहे. दुष्काळ व इतर कारणांमुळे आर्थिक संकटात आलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सरकारने नुकतीच अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना जाहीर केली आहे. यामध्ये कोतुळ सेवा सोसायटीच्या जवळपास ४५० थकबाकीदार शेतकऱ्यांना दोन लाखांच्या थकबाकीपर्यंत तर नियमीत शेतकऱ्यांना पन्नास हजार प्रोत्साहन अनुदानाचा लाभ मिळणार आहे.

संस्थेच्या पहिल्या यादीमध्ये २५७ शेतकऱ्यांची नावे आले. त्यानंतर दुसऱ्या यादीमध्ये २४ शेतकऱ्यांची नावे आली होती. उर्वरीत शेतकरी प्रतीक्षा करत होते.मात्र काल प्रकाशित झालेल्या तिसऱ्या यादीत संस्थेच्या अवघ्या एका शेतकऱ्याचे नाव यादीत आल्याने शेतकऱ्यांची घोर निराशा झाली आहे.

शासन या योजनेचा मोठा गाजावाजा करत आहे. परंतु शेतकरी दुष्काळाने पिचला आहे तो शासनाच्या मदतीची वाट पाहत आहे. शासनाने अशा पद्धतीने शेतकऱ्यांची थट्टा करू नये, कर्ज माफीत बसलेल्या सर्वच शेतकऱ्यांना तातडीने मदत द्यावी तसेच नियमित कर्ज परत फेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये अनुदानचा लाभ तातडीने मिळावा.

अन्यथा संस्थांची थकबाकी वाढेल व विकास सेवा सोसायट्यांचे अस्तिवत धोक्यात येईल, अशी भीती कोतुळ सोसायटीचे सदस्य व माजी उप सरपंच राजू पाटील देशमुख यांनी व्यक्त केली आहे.

राहाता येथे महसूल लोकअदालत

जनता आवाज वृत्तसेवा

शिर्डी : राहाता महसूल प्रशासनातील वर्षानुवर्षे प्रलंबित असलेले जमीन व महसूलविषयक दावे, अपील तसेच अन्य अर्धन्यायिक प्रकरणांचा जलद आणि परस्पर संमतीने निपटारा करण्यासाठी दि. २८ ऑक्टोबर आणि १६ डिसेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता राहाता व कोपरगाव तहसील कार्यालयात स्वतंत्रपणे या लोकअदालती पार पडतील. महात्मा ज्योतिराव फुले महसूल लोकअदालत अभियाना अंतर्गत शिर्डी उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या विशेष महसूल लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. शिर्डी उपविभागातील अर्धन्यायिक न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या पात्र प्रकरणांचा या लोकअदालतीमध्ये समावेश करण्यात येणार आहे.

यामध्ये महसुली दावे व अपील, रस्ता वहिवाटीचे दावे, वारस नोंदी, अधिकार अभिलेखांशी संबंधित प्रकरणे, ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह व कल्याण अधिनियमांतर्गत प्रकरणे, तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ८५ अन्वये वाटपाची प्रकरणे आदींचा समावेश असेल. लोकअदालतीच्या माध्यमातून दोन्ही पक्षकारांच्या परस्पर संमतीने वाद मिटवण्याची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. याचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या पक्षकारांनी किंवा त्यांच्या अधिकृत वकिलांनी, प्रकरण प्रलंबित असलेल्या अर्धन्यायिक न्यायालयात अथवा कार्यालयात निर्धारित प्रपत्र-अ मध्ये तडजोडीसाठी अर्ज सादर करावा. अर्जांची छाननी करून संमती निश्चित झाल्यानंतर कायदेशीर प्रक्रियेद्वारे तडजोडनामा घेतला जाईल. लोकअदालतीच्या दिवशी दोन्ही पक्षकारांच्या संमतीने अंतिम आदेश पारित करून प्रकरणांचा कायद्यानुसार निपटारा करण्यात येईल. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले महसूल व जमिनीचे वाद परस्पर सामंजस्याने सोडवण्यासाठी संबंधित पक्षकारांनी विहित प्रक्रिया वेळेत पूर्ण करून या अभियानाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी माणिक आहेर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

अमृतवाहिनीत ‘फूड एक्स्पो २०२६’चे आयोजन

जनता आवाज वृत्तसेवा

संगमनेर : जागतिक अन्नदिनाचे औचित्य साधून अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेच्या अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या वतीने शुक्रवार, दि. १६ व १७ ऑक्टोबर रोजी ‘फूड एक्स्पो २०२६’ या भव्य अन्नप्रक्रिया तंत्रज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता अमृतवाहिनी शिक्षण संकुलातील वसंतदादा क्रीडा संकुल येथे संस्थेचे अध्यक्ष तथा माजी कृषीमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती प्राचार्य डॉ. राजेंद्र वाघ यांनी दिली आहे.



या प्रदर्शनाबाबत अधिक माहिती देताना ते म्हणाले की, अन्नप्रक्रिया क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान, नाविन्यपूर्ण संकल्पना आणि कृषी उत्पादनांच्या मूल्यवर्धनाच्या विविध संधी सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविणे हा या प्रदर्शनाचा प्रमुख उद्देश आहे. अन्नाची गुणवत्ता व सुरक्षितता, आधुनिक प्रक्रिया तंत्रज्ञान, अन्नाची नासाडी कमी करण्याचे उपाय तसेच विविध कृषी उत्पादनांपासून मूल्यवर्धित पदार्थ तयार करण्याच्या संधींची माहिती या प्रदर्शनातून देण्यात येणार आहे.

शेतमालाला योग्य बाजारपेठ मिळवून देण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी अन्नप्रक्रिया उद्योग महत्त्वाची भूमिका बजावतात. कृषी उत्पादनांवर प्रक्रिया करून त्यांचे मूल्य वाढविल्यास शेतकऱ्यांना आर्थिक लाभ मिळण्याबरोबरच ग्रामीण भागात उद्योग आणि रोजगारनिर्मितीलाही चालना मिळू शकते. विशेषतः ग्रामीण भागातील तरुण, महिला बचतगट आणि नवउद्योजकांसाठी अन्नप्रक्रिया उद्योग हे स्वयंरोजगाराचे प्रभावी माध्यम ठरू शकतात. या दृष्टीने ‘फूड एक्स्पो २०२६’ हे प्रदर्शन मार्गदर्शक ठरणार आहे.

अग्रीपंख फौडेशनच्यावतीने गुणवंतांचा सत्कार

जनता आवाज वृत्तसेवा

श्रीगोंदा : विद्यार्थ्यांच्या जीवनात आत्मविश्वास निर्माण करण्याच्या जाणीवेतून अग्रीपंख फौडेशनने श्रीगोंदा येथील महादजी शिंदे विद्यालयाच्या सभागृहात आयोजीत विद्यार्थी प्रोत्साहन सोहळा आयोजीत केला. या सोहळ्यात श्रीगोंदा तालुक्यातील युपीएसी, एनआयडी, एमपीएससी, एनआयएफटी, एनएनआयएम शासकीय शिष्यवृत्ती इस्त्रो सहलीसाठी निवड झालेल्या ३२५ विद्यार्थ्यांना सन्मानपत्र व मानाची कॅप देऊन सन्मान केला. हा सन्मान तहसीलदार सचीन डोंगरे, जेष्ठ नेते बाबासाहेब भोस, गटविकास अधिकारी राणी फराटे, नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी पुष्पगंधा भगत, गटशिक्षणाधिकारी कुसुमकुमारी कानडी व अग्रीपंखचे उपाध्यक्ष प्रा संजय लाकुडझोडे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी तहसीलदार सचीन डोंगरे म्हणाले कि, युपीएससी व एमपीएससी इतर परिक्षांचा शासकीय शिष्यवृत्ती परिक्षा हा पाया आहे. पण या मेरीटमध्ये आलेल्या विद्यार्थ्यांनी अभ्यासात सातत्य ठेवले तर निश्चितच अधिकारी होण्याची मोठी संधी आहे. बाबासाहेब भोस यांनी अग्रीपंख फौडेशन विद्यार्थी व शाळांसाठी जे उपक्रम राबत आहे त्याचे कौतुक केले. प्रास्ताविक महादजी शिंदे विद्यालयाचे प्राचार्य डी. डी. भुजबळ यांनी केले. यावेळी डॉ. उत्तम वडवकर धर्मनाथ काकडे, एनटी शेलार, मधुकर सुपेकर, बापुसाहेब गायकवाड, मधुकर काळाणे, आबासाहेब जगताप उपस्थित होते.

राहुरी-शनि शिंगणापूर रेल्वेमार्गाचे भूसंपादन रद्द करा

खासदार नीलेश लंके यांचे केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना निवेदन

जनता आवाज वृत्तसेवा

अहिल्यानगर : राहुरी- शनि शिंगणापूर नवीन रेल्वेमार्गासाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या भूसंपादन प्रक्रियेचा पुनर्विचार करून ती रद्द करावी, अशी मागणी खासदार नीलेश लंके यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



प्रस्तावित रेल्वेमार्गामुळे सुपीक आणि बागायती शेतजमिनी बाधित होण्याची शक्यता असून, त्याचा शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर आणि उपजीविकेवर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो, असे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. भारताच्या राजपत्रात १० डिसेंबर २०२५ रोजी मध्य रेल्वेच्या माध्यमातून प्रसिद्ध झालेल्या अधिसूचनेनुसार, राहुरी तालुक्यातील उंबरे, ब्राम्हणी, देसवंडी आणि कोंढवड येथील जमिनी प्रस्तावित रेल्वेमार्गासाठी अधिग्रहित करण्याची प्रक्रिया विचाराधीन आहे. या परिसरातील बहुतांश शेतकरी शेतीवर अवलंबून असून, संबंधित जमिनी सुपीक, बागायती आणि अधिक उत्पादन देणाऱ्या आहेत. त्यामुळे भूसंपादन झाल्यास शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्नावर तसेच त्यांच्या कुटुंबांच्या उदरनिर्वाहावर परिणाम होण्याची शक्यता खासदार लंके यांनी व्यक्त केली आहे.

पर्यायी मार्गांचा सखोल अभ्यास करावा

राहुरी येथे यापूर्वीपासून रेल्वेमार्ग आणि रेल्वेस्थानक अस्तित्वात असताना, नवीन रेल्वेमार्गाची आवश्यकता आणि उपलब्ध पर्यायी मार्गांचा सखोल अभ्यास करण्यात यावा, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. रेल्वे विकासाला विरोध करण्यापेक्षा विकासकामांचे नियोजन करताना शेतकऱ्यांच्या जमिनी, उपजीविकेची साधने आणि भविष्यातील शेतीचे हित सुरक्षित ठेवणे महत्त्वाचे आहे, अशी भूमिका लंके यांनी मांडली आहे.

प्रस्तावित रेल्वेमार्गामुळे शेतजमिनींचे विभाजन होऊन शेतीची कामे करणे, सिंचन व्यवस्था सांभाळणे आणि शेताच्या विविध भागांत पोहोचणे अडचणीचे ठरू शकते. राहुरी परिसरातील सुमारे १५ ते २० किलोमीटरच्या पट्ट्यात सात ते आठ साखर कारखाने असून, या भागातील शेती आणि कृषी अर्थव्यवस्थेला मोठे महत्त्व आहे. अशा परिस्थितीत मोठ्या प्रमाणावर जमिनींचे अधिग्रहण करताना शेतकऱ्यांच्या हिताचा गांभीर्याने विचार करणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

नदीजोड प्रकल्पातून पाणी प्रश्न सोडविणार

जनता आवाज वृत्तसेवा

संगमनेर : अनेक वर्षांपासून रखडलेल्या भोजापूर चारीच्या कामासाठी ४५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. तसेच प्रस्तावित दमणगंगा-वैतरणा नदीजोड प्रकल्पामध्ये या परिसरातील गावांचा समावेश करण्यात आला आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून परिसरातील पाण्याचा प्रश्न सोडवून भविष्यात महिलांच्या डोक्यावरील हंडा उतरविण्याचा आपला प्रयत्न राहणार असल्याचा विश्वास आमदार अमोल खताळ यांनी यांनी दिला.



नवरात्र उत्सवानिमित्त काकडवाडी येथील महालक्ष्मी माता तसेच निमोन येथील जगदंबा माता मंदिरात दर्शन घेतल्यानंतर आमदार खताळ यांनी या दोन्ही ठिकाणी सुरू असणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताहाला हजेरी लावली. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी सोपान महाराज शास्त्री आणि अभिषेक महाराज सांगळे यांचा आमदार खताळ यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.आमदार खताळ म्हणाले, की आमदारपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर गेल्या दोन वर्षांत प्रामाणिकपणे काम करण्याचा प्रयत्न केला आहे. तालुक्यातील प्रत्येक गावाला निधी देण्याचा प्रयत्न केला असून, आगामी काळातही विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आपण कमी पडणार नाही.

‘मागणाऱ्याने मागत राहावे आणि देणाऱ्याने देत राहावे; मात्र मागणाऱ्याची झोळी फाटकी नसावी,’ असा चिमटाही त्यांनी यावेळी काढला. काकडवाडी परिसरात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली होती. त्यावेळी स्वखर्चातून टँकर सुरू करून गावातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी हातभार लावला होता. मात्र, या भागातील पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटावा, हाच आपला प्रामाणिक हेतू आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दुष्काळग्रस्त ऊस पिकांचेही पंचनामे होणार

जनता आवाज वृत्तसेवा

नेवासा : पाण्याअभावी वाढ खुंटलेल्या, जाडी व वजन घटलेल्या आणि उत्पादनात नुकसान होण्याची शक्यता असलेल्या ऊस पिकांचेही पंचनामे करण्याचे निर्देश कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले. आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांनी केलेल्या मागणीची त्यांनी दखल घेतली. नेवासा तालुक्यासह राज्यातील अनेक भागांत अल्प पाऊस आणि पावसातील दीर्घ खंडामुळे ऊस उत्पादक शेतकरी संकटात सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर लंघे पाटील यांनी मंत्रालयात कृषिमंत्र्यांना निवेदन दिले. यावेळी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील उपस्थित होते. ऊस पूर्ण वाळला तरच नुकसान, ही मर्यादा नको! पाण्याअभावी ऊसाची वाढ खुंटणे, जाडी व वजन घटणे आणि परिणामी उत्पादन कमी होणे, यामुळेही शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होते. त्यामुळे केवळ वाळलेल्या किंवा नष्ट झालेल्या पिकांचेच नव्हे, तर अशा प्रकारे नुकसान झालेल्या ऊस पिकांचेही पंचनामे करावेत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. नुकसानग्रस्त ऊस उत्पादकांना लागू निकषांनुसार आर्थिक मदत द्यावी किंवा त्यासाठी विशेष शासन निर्णय घ्यावा, अशी मागणीही करण्यात आली. कृषिमंत्र्यांच्या निर्देशांमुळे पंचनाम्यांचा मार्ग मोकळा झाला असला, तरी शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मदत मिळण्यासाठी पुढील शासन निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे.


संपादकीय

विषयाच्या मुळाशी जायचे तर...

मुंबई 'आयआयटी'तील विद्यार्थी साहिल वाकोडेच्या आत्महत्येने विद्यार्थी कल्याण, परीक्षा पद्धती, प्राध्यापक-विद्यार्थी संबंध आणि संस्थात्मक संवेदनशीलता हे मुद्दे पुन्हा ऐरणीवर आले. या प्रकरणी प्रा. सूर्यनारायण दुल्ला यांच्याविरोधात जातीय भेदभावाचा आरोप झाला आहे. मात्र यामुळे आरोप सिद्ध होत नाही तसेच आंदोलनाच्या दबावाखाली तातडीने शिक्षा ठोठावणे म्हणजे न्याय नव्हे. तपास यंत्रणेला निष्पक्षपणे काम करू द्यायलाच हवे. या प्रकरणात विद्यार्थ्यांनी विविध मागण्या केल्या. त्यात स्वतंत्र चौकशी, विद्यार्थी कल्याणाशी संबंधित बदल, मानसिक आरोग्याच्या सुविधा आणि प्राध्यापकांवरील कारवाईसह अनेक मुद्द्यांचा समावेश आहे. संस्थेने १८ मागण्यांवर चर्चा करण्याची तयारी दर्शवली. त्याच पार्श्वभूमीवर प्रा. दुल्ला यांना अधिष्ठाता पदाच्या प्रशासकीय जबाबदाऱ्यांपासून तात्पुरते दूर करण्यात आले; मात्र ते प्राध्यापक म्हणून कार्यरत राहिले. संस्थेने पुढील कारवाई तपासाच्या निष्कर्षांनंतर करण्याचे स्पष्ट केले आहे. याकडे दोन टोकांच्या चष्म्यातून पाहणे चुकीचे ठरेल. एका बाजूला विद्यार्थ्यांच्या भावनांकडे दुर्लक्ष करता येणार नाही. एका तरुणाचा मृत्यू झाला आहे. त्याच्या कुटुंबाने गंभीर आरोप केले आहेत. संस्थेच्या सुरुवातीच्या निवेदनावरही प्रश्न उपस्थित झाले आणि नंतर 'आयआयटी' मुंबईने त्या निवेदनाबद्दल माफी मागून तपास पूर्ण होण्यापूर्वी परिस्थितीविषयी भाष्य करणे योग्य नसल्याचे मान्य केले. दुसऱ्या बाजूला, आरोप झाले म्हणून संबंधित व्यक्ती दोषी ठरते, असा समजही तितकाच घातक आहे. या प्रकरणात प्राध्यापकांच्या समर्थनार्थ 'आयआयटीच्या फॅकल्टी फोरम'ने ठोस भूमिका घेतली. त्यांचे म्हणणे आहे, की प्राध्यापकांनी संस्थेच्या नियमांनुसार काम केले. काही विद्यार्थ्यांनीही निष्पक्ष तपासाची गरज व्यक्त केली आहे. म्हणजेच खुद्द कॅम्पसमध्येही या प्रकरणाकडे पाहण्याचे एकापेक्षा अधिक दृष्टिकोन आहेत. म्हणूनच आता सर्वात महत्त्वाचे आहे ते आरोप आणि निष्कर्ष यांच्यामधील अंतर कायम ठेवणे.गुन्हा दाखल झाल्यानंतर तपास होणे ही कायद्याची प्रक्रिया आहे. त्या तपासाचा निष्कर्ष येण्याआधी एखाद्याला दोषी ठरवणे, सामाजिकदृष्ट्या आरोपीच्या पलीकडे गुन्हेगार मानणे किंवा दबाव आणून त्याच्यावर अंतिम कारवाई करवून घेणे हे न्यायाच्या मूलभूत तत्त्वांशी विसंगत आहे. उद्या कोणत्याही महाविद्यालयात किंवा विद्यापीठात एखाद्या विद्यार्थ्याने एखाद्या प्राध्यापकाविरोधात गंभीर आरोप केला आणि त्यानंतर जमावाच्या दबावामुळे संबंधित प्राध्यापकाला तातडीने दोषी मानले गेले, तर संस्थांमधील शिस्त, नियम आणि न्यायनिवाड्याची संपूर्ण प्रक्रिया कुठे उरेल? याचा अर्थ विद्यार्थ्यांनी गप्प बसावे, असा अजिबात नाही. उलट, विद्यार्थ्यांचे म्हणणे ऐकले गेले पाहिजे. तक्रार निवारण यंत्रणा प्रभावी असली पाहिजे. मानसिक ताण, शैक्षणिक दबाव, जातीय भेदभावाच्या तक्रारी, प्राध्यापकांचे वर्तन, परीक्षेतील नियम आणि शिस्तभंगाची प्रक्रिया याबाबत पारदर्शक व्यवस्था असली पाहिजे. विद्यार्थ्याला समस्या मांडण्यासाठी प्राचार्य, अधिष्ठाता किंवा प्रशासनाच्या दारात वारंवार धावाधाव करावी लागणार नाही, अशी सक्षम यंत्रणा असणे ही कोणत्याही उच्च शिक्षणसंस्थेची मूलभूत जबाबदारी आहे. इथे प्राध्यापकांच्या भूमिकेचाही प्रश्न निर्माण होतो. शिक्षक हा केवळ नियमांची अंमलबजावणी करणारा अधिकारी नसतो. तो विद्यार्थ्याचा मार्गदर्शकही असतो. परीक्षा हॉलमध्ये गैरप्रकार आढळल्यास नियम लागू करणे आवश्यक आहे. नियम मोडल्यास शिस्तभंगाची कारवाईही आवश्यक असू शकते; परंतु नियमांची अंमलबजावणी करताना विद्यार्थ्याच्या मानवी बाजूचा विसर पडू नये.

प्राध्यापकांच्या एका वाक्याचा, एका नजरेचा किंवा सार्वजनिकरीत्या केलेल्या एका टिप्पणीचा विद्यार्थ्याच्या मनावर परिणाम होऊ शकतो, याची जाणीव शिक्षकांनी ठेवली पाहिजे. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनीही प्रत्येक कठोर शैक्षणिक निर्णयाला छळ किंवा अन्यायाचे रूप देण्यापूर्वी वस्तुस्थिती तपासली पाहिजे. आजच्या स्पर्धात्मक शिक्षणव्यवस्थेत विद्यार्थी आधीच प्रचंड दबावाखाली असतात. गुण, परीक्षा, प्लेसमेंट, संशोधन, भविष्याची चिंता, आर्थिक अडचणी, सामाजिक अपेक्षा आणि कुटुंबीयांचा दबाव यांचा भार त्यांच्या मनावर असतो. अशा परिस्थितीत संस्थेने विद्यार्थ्यांकडे केवळ 'रोल नंबर' किंवा 'कामगिरीचा आकडा' म्हणून पाहणे ही मोठी चूक आहे. प्रत्येक कॅम्पसमध्ये समुपदेशन, मानसिक आरोग्य सेवा, तक्रार निवारण आणि संकटाच्या वेळी तातडीची मदत उपलब्ध असणे गरजेचे आहे; मात्र विद्यार्थी कल्याणाच्या या गरजा पूर्ण करण्यासाठी झुंडशाहीचा आधार घेण्याची गरज नसावी. प्रशासनाने मागण्या मान्य केल्या, की आंदोलन यशस्वी झाले आणि तपासाच्या आधीच व्यक्तीवर कारवाई झाली, की न्याय मिळाला, अशी समीकरणे तयार झाली, तर भविष्यात प्रत्येक संवेदनशील प्रकरणाचा शेवट संस्थात्मक प्रक्रियेत न होता दबावाच्या राजकारणात होण्याची शक्यता वाढेल. या घटनेनंतर 'आयआयटी' प्रशासनाने मागितलेली माफीही महत्त्वाची आहे. तपास सुरू असताना मृत विद्यार्थ्याच्या वर्तनाबाबत निष्कर्षात्मक भाषा वापरणे टाळले पाहिजे. मृत व्यक्ती स्वतःचा बचाव करू शकत नाही. त्यामुळे कोणत्याही संस्थेने मृत विद्यार्थ्याविषयी निवेदन करताना अधिक संवेदनशीलता आणि संयम दाखवणे आवश्यक आहे. आता साहिलला परत आणता येणार नाही; पण त्याच्या मृत्यूनंतरही आपण फक्त दोषी कोण, निर्दोष कोण, कोणाची मागणी मान्य झाली आणि कोणाचा दबाव चालला, एवढ्यापुरतेच हे प्रकरण पाहिले तर त्या मृत्युतून समाजाला काहीही शिकता येणार नाही. न्यायव्यवस्थेचा पाया पुराव्यावर असतो, घोषणांवर नाही. शिक्षणसंस्थेचा पाया विश्वासावर असतो, भीतीवर नाही. विद्यार्थी आंदोलनाचा पाया प्रश्न विचारण्याच्या अधिकारावर असतो, तर प्रशासनाचा पाया पारदर्शकतेवर आणि शिक्षकाच्या भूमिकेचा पाया केवळ शिस्तीत नसून संवेदनशीलतेतही असतो. म्हणूनच साहिल वाकोडे प्रकरणात दोन गोष्टी एकाच वेळी घडल्या पाहिजेत. आरोपांची कसून, निष्पक्ष आणि वेळेत चौकशी झाली पाहिजे आणि दोषी आढळल्यास कायद्यानुसार कठोर कारवाई झाली पाहिजे; पण तपास पूर्ण होण्याआधी कोणालाही दोषी ठरवण्याची किंवा झुंडशाहीच्या दबावातून अंतिम निर्णय घेण्याची पद्धत स्वीकारता कामा नये. विद्यार्थ्यांना न्याय मिळायलाच हवा; पण न्याय मिळवण्याची प्रक्रियाच कमकुवत झाली, तर उद्या त्याच प्रक्रियेचा फटका विद्यार्थ्यांनाही बसू शकतो.

निसर्गवैभव आणि परंपरेचा अनोखा संगम निघोजची श्री मळगंगा माता



महाराष्ट्राच्या धार्मिक परंपरेत काही देवस्थाने अशी आहेत, जिथे केवळ दर्शन होत नाही, तर त्या भूमीशी जोडलेली श्रद्धा, लोकपरंपरा आणि निसर्गाचा अद्भुत अनुभव भाविकांना मिळतो. पारनेर तालुक्यातील श्रीक्षेत्र निघोज येथील श्री मळगंगा मातेचे देवस्थान हे अशाच जागृत श्रद्धास्थानांपैकी एक आहे. 'नवसाला पावणारी माता' अशी भक्तांची श्रद्धा असलेल्या या देवस्थानाला राज्यभरातून भाविकांची मोठी गर्दी असते.

कुकडी नदीच्या पवित्र तीरावर वसलेले निघोज हे धार्मिक आणि भौगोलिक वैशिष्ट्यांनी समृद्ध गाव आहे. श्री मळगंगा मातेचे मंदिर, कुकडी नदीतील प्रसिद्ध रांजणखळगे, प्राचीन बारव आणि निसर्गरम्य परिसर यामुळे निघोजला धार्मिक पर्यटनाच्या नकाशावर वेगळे स्थान मिळाले आहे.

कुकडीच्या दोन्ही तीरांवर मातेचे स्थान

कुकडी नदीच्या दोन्ही तीरांवर मळगंगा मातेची मंदिरे आहेत. एका बाजूला नगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील निघोज, तर दुसऱ्या बाजूला पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील टाकळी हाजी आहे. नदीवरील झुलता लोखंडी पूल या दोन्ही मंदिरांना जोडणारा श्रद्धेचा दुवा ठरला आहे.

लोकपरंपरेत जपली गेलेली देवीची महती

मळगंगा मातेच्या प्रकट होण्याबाबत स्थानिक लोकपरंपरेत अनेक आख्यायिका सांगितल्या जातात. धुम राक्ष नावाच्या दैत्याच्या अत्याचारांपासून देव, ऋषी-मुनी आणि प्रजेचे रक्षण करण्यासाठी देवीने दैत्याचा वध केला आणि त्यानंतर कुकडी नदीच्या परिसरात वास्तव्य केले, अशी भक्तांची श्रद्धा आहे. देवीच्या सात बहिणी विविध ठिकाणी विराजमान असल्याचीही लोकमान्यता आहे. या आख्यायिका पिढ्यान्पिढ्या चालत आलेल्या श्रद्धा आणि धार्मिक परंपरेचा भाग आहेत.

रांजणखळग्यांमुळे निघोजचे वेगळेपण

निघोजचा उल्लेख झाला की कुकडी नदीतील रांजणखळग्यांचे निसर्गवैभव डोळ्यासमोर येते. नदीच्या पाण्याच्या प्रवाहामुळे खडकांमध्ये निर्माण झालेल्या या गोलाकार खोलगट रचना जगप्रसिद्ध आहेत. स्थानिक श्रद्धेत या परिसराला 'कुंडम ाऊली' असेही म्हटले जाते. देवीच्या दर्शनासाठी आलेला भाविक मंदिरासोबतच या निसर्गाच्या अद्भुत रचनेकडेही आकर्षित होतो. त्यामुळे निघोज हे श्रद्धा आणि निसर्गाचा सुंदर संगम असलेले ठिकाण ठरले आहे.

घागर दर्शनाची अनोखी परंपरा

मळगंगा मंदिरामागील प्राचीन बारव हे देवस्थानाचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. या बारवेशी जोडलेली घागर दर्शनाची परंपरा आजही श्रद्धेने जपली जाते. चैत्र यात्रेच्या काळात या परंपरेला विशेष महत्त्व असते. घागर दर्शन हा केवळ धार्मिक विधी नसून निघोजच्या सांस्कृतिक ओळखीचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे.

नवस फेडण्यासाठी येतात भाविक

'मळगंगा माता नवसाला पावते' हा भक्तांच्या मनातील दृढ विश्वास आहे. महाराष्ट्राच्या विविध भागांतून भाविक येथे नवस बोलण्यासाठी आणि पूर्ण झाल्यानंतर तो फेडण्यासाठी येतात. ओटी भरणे, साडी-चोळी अर्पण करणे, नारळ अर्पण करणे, अभिषेक आणि विविध धार्मिक विधींच्या माध्यमातून भक्त आपली श्रद्धा व्यक्त करतात. अनेक कुटुंबांमध्ये मळगंगा मातेला कुलदैवताचे स्थान आहे.

यात्रेत भक्तीचा महासागर

श्री मळगंगा मातेची यात्रा हा निघोजच्या धार्मिक जीवनातील मोठा उत्सव मानला जातो. यात्रेच्या काळात पालखी सोहळे, धार्मिक कार्यक्रम, महाप्रसाद आणि विविध पारंपरिक उपक्रम ांमुळे संपूर्ण परिसर भक्तिमय होतो. ही यात्रा केवळ धार्मिक सोहळा नसून ग्रामस्थ, व्यापारी, व्यावसायिक आणि बाहेरगावी स्थायिक झालेल्या नागरिकांना एकत्र आणणारी सामाजिक परंपरा आहे.

परंपरेच्या संवर्धनाची गरज

मंदिर परिसराचा विकास ग्रामस्थ, भाविक आणि देणगीदारांच्या योगदानातून झाला आहे. स्वच्छता, कुकडी नदीचे संरक्षण, रांजणखळग्यांचे संवर्धन, प्राचीन बारवेचे जतन आणि यात्रेतील सुरक्षितता याकडे सातत्याने लक्ष देणे आवश्यक आहे. निघोजची श्री मळगंगा माता ही आज केवळ एका गावाची ग्रामदैवत राहिलेली नाही, तर लाखो भाविकांच्या श्रद्धेचे केंद्र बनली आहे. श्रद्धा, परंपरा आणि निसर्गवैभवाचा हा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविणे हीच खरी जबाबदारी आहे.कुकडीच्या तीरावर नांदणारी श्री मळगंगा माता म्हणजे भक्तांच्या विश्वासाची सावली, नवसाला पावणारी शक्ती आणि निघोजच्या भूमीची आध्यात्मिक ओळख आहे.

निलिमा खोसे पाटील

चलनाच्या आमिषाने साडेअकरा लाखांना गंडा

जनता आवाज वृत्तसेवा

अहिल्यानगर : शहरात सायबर फसवणुकीच्या घटना वाढत असतानाच वाहन चलनाच्या नावाखाली एका नागरिकाला तब्बल ११ लाख ४१ हजार ९७३ रुपयांना गंडा घातल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सायबर भामट्यांनी मोबाईलवर बोगस वाहन चलनासंदर्भातील ॲप्लिकेशन फाईल पाठवून ती उघडण्यास भाग पाडले. त्यानंतर मोबाईलचा अनधिकृत ताबा मिळवत बँक खात्यातून वेगवेगळ्या टप्प्यांत



मोठी रक्कम परस्पर काढून घेतली.

या प्रकरणी हर्षल नरेंद्र शेकटकर (वय ३९, रा. चितळे रोड, नेहरू मार्केटमागे, भराड गल्ली, तोफखाना, अहिल्यानगर) यांनी सायबर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात सायबर भामट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी पाच ते ८ ऑक्टोबर रोजी दुपारी तीन वाजेपर्यंत हा प्रकार घडला. शेकटकर हे घरी असताना त्यांच्या मोबाईलवर अज्ञात व्यक्तीने वाहन चलनासंदर्भातील अनधिकृत ॲप्लिकेशनची फाईल पाठवली. त्यांनी ती फाईल उघडल्यानंतर सायबर गुन्हेगारांनी त्यांच्या मोबाईलचा ताबा बेकायदेशीररीत्या मिळवला.

मोबाईलचा ताबा मिळताच भामट्यांनी त्यांच्या बँक खात्यातून वेगवेगळ्या व्यवहारांद्वारे ११ लाख ४१ हजार ९७३ रुपये परस्पर काढून घेतले. आपल्या खात्यातून एवढी मोठी रक्कम लंपास झाल्याचे लक्षात आल्यानंतर शेकटकर यांनी पोलिसांकडे धाव घेतली.

या घटनेमुळे नागरिकांमध्ये सायबर सुरक्षेबाबत चिंता निर्माण झाली आहे. वाहन चलन, दंड किंवा वाहतूक नियमभंगाच्या नावाखाली मोबाईलवर आलेल्या अनोळखी ॲप्लिकेशन फाईल उघडू नयेत, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे. सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

पान १ वरून

दुष्काळाच्या संकटात बळीराजाला आधार

मात्र, अनियमित पाऊस, गारपीट, दुष्काळ, अतिवृष्टी, महापूर यांसारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. परिणामी शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो आणि अनेकदा शेती कर्जाची मुदतीत परतफेड करणे शक्य होत नाही. कर्ज थकीत झाल्याने बँकांकडून नव्याने पीक कर्ज मिळण्यातही अडचणी निर्माण होतात. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली आहे. या योजनेअंतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यात आतापर्यंत १ लाख १५ हजार २१५ शेतकऱ्यांच्या खात्यावर १ हजार ११४ कोटी रुपयांची कर्जमुक्तीची रक्कम जमा करण्यात आली आहे. ज्या पात्र शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण अद्याप पूर्ण झालेले नाही, त्यांचे प्रमाणीकरण पूर्ण होताच त्यांच्या कर्जखात्यावर लाभाची रक्कम टप्प्याटप्प्याने हस्तांतरित करण्यात येणार आहे.

शेतकऱ्यांना सौर ऊर्जेचा आधार

३३/११ केव्ही चास उपकेंद्राला सौर वीज उपलब्ध करून दिली जाणार आहे. या माध्यमातून चासनळी उपकेंद्रांतर्गत मंजूर एजी, वडगाव एजी, बक्तरपूर एजी आणि मोरविस एजी या चार कृषी वाहिन्यांना वीजपुरवठा केला जाणार आहे. त्यामुळे चासनळी, मोर्विस, वडगाव, बक्तरपूर, मंजूर आणि हांडेवाडी या सहा गावांतील शेतीपंप ग्राहकांना याचा थेट फायदा होणार आहे. शेतीपंपांना दिवसा अधिक सक्षम वीजपुरवठा उपलब्ध करून देण्याबरोबरच वीजभाराचे व्यवस्थापन सुधारण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेतीच्या कामासाठी वीजपुरवठ्याबाबत अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. या पार्श्वभूमीवर स्थानिक पातळीवर सौर ऊर्जेचा वापर करून कृषी वीजपुरवठा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने शहा येथील प्रकल्प महत्त्वाचा मानला जात आहे. शेतकऱ्यांच्या वीजविषयक अडचणी लक्षात घेऊन आमदार विवेक कोल्हे यांनी संबंधित यंत्रणेकडे विशेष पत्रव्यवहार केला होता. प्रकल्पाच्या कार्यान्वित होण्यासंदर्भात त्यांनी सातत्याने पाठपुरावा केल्याने आता हा प्रकल्प लवकरच कार्यान्वित होण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे संबंधित गावांतील शेतकऱ्यांना दिवसा शेतीपंपांसाठी अधिक विश्वासार्ह वीजपुरवठा मिळण्याची अपेक्षा आहे. शहा येथील ७ मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प सुरू झाल्यानंतर चार कृषी वाहिन्यांवरील वीजपुरवठा अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे. सहा गावांतील शेतीपंप ग्राहकांना याचा थेट लाभ मिळणार असल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. या प्रकल्पासाठी केलेल्या विशेष पत्रव्यवहार व सातत्यपूर्ण पाठपुराव्याबद्दल शेतकऱ्यांनी आ. विवेक कोल्हे यांचे आभार व्यक्त केले आहेत.

मराठा प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी संवाद कायम ठेवणार : विखे पाटील

पाटील यांनी सांगितले.

५२ लाखांहून अधिक कुणबी प्रमाणपत्रांचे वितरण– राज्यात आतापर्यंत ५२ लाखांपेक्षा अधिक कुणबी प्रमाणपत्रांचे वितरण झाले आहे. उपसमिती पुनर्गठित झाल्यानंतर राज्यात ४ लाख २८ हजार, तर मराठवाड्यात ८१ हजार कुणबी प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत. न्यायमूर्ती शिंदे समितीला ३० जून २०२७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून, नव्याने कुणबी नोंदी शोधण्याचे काम सुरू करण्यात येणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. कुणबी जात प्रमाणपत्र पडताळणी प्रक्रियेत २०२३ पासून राज्यात २ लाख ६० हजार प्रमाणपत्रे वैध ठरली आहेत. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदत देण्यात आली आहे.

विद्यार्थी व उद्योजकांसाठी योजनांचा आढावा– मराठा समाजातील विद्यार्थ्यांना ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्याप्रमाणे शैक्षणिक सवलती लागू करण्यात आल्या आहेत. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत ४६५ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला आहे. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत २०१८ पासून १ लाख ८१ हजार उद्योजक घडविण्यात आले असून, बँकांमार्फत १५ हजार ८९३ कोटी रुपयांची कर्जे मंजूर झाली आहेत.

चोर चोर चोहीकडे, पोलीस गेले कोणीकडे?

जिल्ह्यात चोरीची घटना घडल्यानंतर संबंधित पोलीस ठाण्याकडून तपास सुरू केला जातो. घटनास्थळाची पाहणी, पुरावे गोळा करणे, संशयितांचा शोध घेणे आणि चोरीस गेलेल्या मुद्देमालाचा माग काढणे या बाबींना महत्त्व असते. मात्र, गुन्हे उघडकीस येण्यास विलंब होत असल्यास चोरट्यांचे मनोबल वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पोलिसांनी प्रलंबित गुन्ह्यांचा तपास वेगाने पूर्ण करून आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

दुसरीकडे, पोलिसांकडून होणारी नियमित गस्तही कमी प्रमाणात होत असल्याच्या तक्रारी नागरिक करीत आहेत. रात्रीच्या वेळी संवेदनशील भागांत तसेच निवासी परिसर, बाजारपेठा आणि निर्जन रस्त्यांवर पोलिसांची गस्त वाढविण्याची गरज आहे. पोलिसांची नियमित उपस्थिती राहिल्यास संभाव्य गुन्हे रोखण्यास मदत होऊ शकते. चोरीच्या घटना घडल्यानंतर तपास करण्याबरोबरच अशा घटना घडू नयेत, यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांवरही भर देणे आवश्यक आहे.

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न लक्षात घेता जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी सर्व पोलीस ठाण्यांच्या कामकाजाचा आढावा घ्यावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. प्रलंबित घरफोडी व दरोड्यांच्या गुन्ह्यांचा तपास वेगाने पूर्ण करणे, चोरीच्या घटनांमधील संशयितांचा शोध घेणे आणि रात्रीची गस्त प्रभावी करणे, यासाठी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी लक्ष घालण्याची आवश्यकता आहे.

नागरिकांच्या मालमत्तेचे संरक्षण करणे आणि त्यांच्यात सुरक्षिततेची भावना निर्माण करणे ही पोलिसांची महत्त्वाची जबाबदारी आहे. त्यामुळे जिल्ह्यातील वाढत्या चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी ठोस कृती आराखडा तयार करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. आता जिल्हा पोलीस प्रशासन या तक्रारींची कितपत दखल घेते आणि चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी कोणती पावले उचलते? याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

पान १ वरून

ग्राउंड ट्रूथिंग अहवाल सादर करा : आ. काळे

महिन्यांपासून पावसाचा प्रदीर्घ खंड पडल्याने सोयाबीन, कापूस, बाजरी, मका यांसह विविध खरीप पिकांची अवस्था अत्यंत गंभीर झाली आहे. पिके करपल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, पशुधनाच्या संगोपनाची चिंताही वाढली आहे.

शेतकऱ्यांनी सुरुवातीला झालेल्या पावसाच्या भरवशावर खरीप पिकांची पेरणी केली. मात्र त्यानंतर पावसाने उघडीप दिल्याने पिकांना आवश्यक पाणी मिळाले नाही. परिणामी उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे जवळपास पूर्ण झाले असून, शासनाने लागू केलेल्या ट्रिगर-१ व ट्रिगर-२ अंतर्गत मिळणाऱ्या सवलतींचा लाभ प्रत्येक पात्र शेतकऱ्याला मिळणे आवश्यक असल्याचे आ. काळे यांनी सांगितले.

ट्रिगर-२ लागू झाल्यामुळे बाधित भागातील शेतकऱ्यांना शेतसारा व जमीन महसुलात सवलत, शेतीशी संबंधित कर्जांच्या वसुलीस स्थगिती, नवीन पीक कर्जाची उपलब्धता, कृषी पंपाच्या वीजबिलात नियमानुसार सवलत आदी लाभ मिळणार आहेत. तसेच शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करणे, टंचाईग्रस्त गावांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी टँकर सुरू करणे आणि रोजगार हमी योजनेअंतर्गत अधिकाधिक रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी मनरेगाच्या निकषांमध्ये शिथिलता देण्याची तरतूद आहे.

दरम्यान, पंचनामे पूर्ण झालेल्या शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी पाच हजार रुपयांची मदत देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. या निर्णयाचे आ. आशुतोष काळे यांनी स्वागत केले असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार मानले.

नुकसानाचे अचूक सर्वेक्षण होऊन त्याचा वस्तुनिष्ठ अहवाल शासनाकडे वेळेत पोहोचल्यास कोपरगाव मतदारसंघातील पात्र शेतकऱ्यांना दुष्काळी सवलती व शासनाची आर्थिक मदत मिळण्यास मोठी मदत होणार आहे.

कंटेनरच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

आबासाहेब पठारे यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, आई-वडील व भाऊ असा परिवार आहे. त्यांच्या अपघाती मृत्यूने शिंगवे गावावर शोककळा पसरली आहे.


धनादेश बाऊन्स प्रकरणी साळुंखे दोषी

नगर न्यायालयाचा निकाल; एक वर्ष कारावास; १५.६० लाखांचा दंड

जनता आवाज वृत्तसेवा

अहिल्यानगर : भिशी योजनेत पैसे गुंतवल्यास चांगला परतावा मिळेल, असे सांगून घेतलेली १३ लाख ६० हजार रुपयांची रक्कम परत करण्यासाठी दिलेले धनादेश अनादरित झाल्याच्या प्रकरणात न्यायालयाने मॅक्स केअर कुरीज इंडिया लिमिटेडचे सचिन कारभारी साळुंखे यांना दोषी ठरविले. न्यायालयाने त्यांना एक वर्ष कारावासाची शिक्षा तसेच एकूण १५ लाख ६० हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. दंडाची रक्कम न भरल्यास आणखी सहा महिने साध्या कारावासाची शिक्षा भोगावी लागणार आहे.

याबाबत असे की, अहिल्यानगर येथील प्रतीक्षा कन्स्ट्रक्शनचे शशिकांत मनोहर चोरमांगे यांना मॅक्स केअर कुरीज इंडिया लिमिटेडचे सचिन कारभारी साळुंखे यांनी



भिशी योजनेत रक्कम गुंतवल्यास चांगला फायदा होईल, असे सांगितले. त्यांच्या म्हणण्यानुसार चोरमांगे यांनी वेळोवेळी एकूण १३ लाख ६० हजार रुपये गुंतविले.

गुंतवणुकीची रक्कम परत करण्यासाठी साळुंखे यांनी चोरमांगे यांना चार धनादेश दिले. त्यापैकी दोन धनादेश प्रत्येकी ३ लाख ५० हजार रुपये, एक धनादेश ३ लाख ६० हजार रुपये आणि एक धनादेश ३ लाख रुपये असा एकूण १३ लाख ६० हजार रुपयांचा भरणा होता.

चोरमांगे यांनी हे चारही धनादेश बँकेत जमा केले. मात्र, संबंधित धनादेश अनादरित झाल्याने त्यांनी सचिन साळुंखे यांच्याविरोधात अहमदनगर येथील मुख्य न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट कायद्याच्या कलम १३८ अन्वये चार स्वतंत्र खटले दाखल केले.

या खटल्यांची सुनावणी अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी पी. ए. पाटील यांच्या न्यायालयासमोर पूर्ण झाली. सुनावणीदरम्यान फिर्यादी प्रतीक्षा कन्स्ट्रक्शनचे शशिकांत मनोहर चोरमांगे यांच्या वतीने ॲड. गुरविंदर पंजाबी यांनी केलेला युक्तिवाद न्यायालयाने ग्राह्य धरला. त्यानंतर न्यायालयाने चारही प्रकरणांत आरोपी सचिन साळुंखे यांना दोषी ठरवत प्रत्येक प्रकरणात एक वर्ष कारावास आणि दंडाची शिक्षा सुनावली.

चारही प्रकरणांतील दंडाची एकत्रित रक्कम १५ लाख ६० हजार रुपये आहे. दंड न भरल्यास प्रत्येक प्रकरणात आणखी सहा महिने साध्या कारावासाची शिक्षा भोगावी लागणार आहे.

फिर्यादीच्या वतीने विधिज्ञ गोरक्ष पालवे व ॲड. गुरविंदर पंजाबी यांनी कामकाज पाहिले. त्यांना सागर गरजे, रोहित बुधवंत, राहुल दहिफळे, विशाल वांढेकर, धनश्री खेतमाळीस, रोहित चांडवले, विवेक बडे, पुष्कराज बिडवाई, प्रवीण निंबाळकर, विवेकानंद बडे, तेजस राख, भक्ती तमनर, बाळकृष्ण गीते, यश केकान, अश्विनी मोरे, भालेराव अनिकेत आंधळे, उत्कर्ष उगलमुगले, श्रावणी सानप व वैष्णवी आव्हाड यांनी सहाय्य केले.

उन्हामुळे कापूस पिकाचा झाला कोळसा

शेतकऱ्यांची वेचणीसाठी पदरमोड; शासकीय मदतीची प्रतिक्षा



शेतकरी काळजीत

दिवाळी-दसरा सण तोंडावर असताना शेतकऱ्यांच्या घरात चिंतेचे वातावरण आहे. सणासाठी नवीन कपडे, मुलांच्या गरजा, घरखर्च च शेतीसाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड, अशी अनेक आर्थिक आव्हाने शेतकऱ्यांसमोर उभी आहेत. कापसाच्या उत्पन्नातून या गरजा भागवण्याची अपेक्षा होती, असे पांडुरंग देसले यांनी सांगितले.

जनता आवाज वृत्तसेवा

शेवगाव : यंदा पावसाच्या कमतरतेमुळे खरीप पिकांचे, विशेषतः कापसाचे अतोनात नुकसान झाले आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे डोळ्यांदेखत पीक जळून खाक होणे आणि दिवाळीसारख्या सणाच्या तोंडावर हातात काहीही न पडणे, ही अत्यंत वेदनादायी परिस्थिती आहे.

यंदा पावसाने पाठ फिरवल्याने खरिपातील पिकांचा अक्षरशः चुराडा झाला. ज्या शेतात कापसाची पांढरी बोंडे डौलाने फुललेली दिसायला हवी होती, तिथे आता चिमुकल्या बोंडांतून कापूस वेचण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली. हातात पडणारा कापूस पाहून शेतकऱ्यांचे डोळे पाणावत आहेत. अद्याप पीकविमा वा शासनाकडून कुठलीही आर्थिक मदत मिळालेली नसल्याने यंदाही दिवाळीचा घास कडू होण्याची चिन्हे आहेत. शेवगाव तालुका हा पांढऱ्या सोन्याचे आगार म्हणून ओळखला जातो. तालुक्यात साधारणपणे ४५ हजार हेक्टरवर कपाशी लागवड केली जाते. कपाशीच्या पिकावरच अनेक शेतकऱ्यांचे वर्षभराचे आर्थिक गणित अवलंबून असते. खरीप हंगामात कापसाचे भरघोस उत्पादन मिळेल, या आशेने शेतकऱ्यांनी बियाणे, खते, औषधांची फवारणी, मशागत आणि मजुरीवर मोठा खर्च केला. मात्र, यंदा पावसाने दीर्घ काळ ओढ दिल्याने या साऱ्या मेहनतीवर पाणी फिरले.

कापसाच्या हंगामात ज्या शेतकऱ्यांच्या घरात ५० क्विंटलपर्यंत कापूस येऊन पडतो, त्याच शेतकऱ्यांना यंदा पाच क्विंटल कापूसही घरात आणणे मुश्कील झाले. शेतशिवाराची अवस्था इतकी बिकट झाली आहे की, शेतात पाऊल ठेवण्याचीही इच्छा होत नाही. मात्र, उरलेला कापूस वाया जाऊ नये, या आशेने काळजावर दगड ठेवून शेतकरी वेचणी करीत आहेत. तालुक्याच्या पूर्व भागातील बोधेगाव, चापडगाव, लाडजळगाव, गोळेगाव, बालमटाकळी, सुकळी, शेकटे, आधोडी, दिवटे व शिंगोरी परिसरात करपलेल्या कपाशीच्या झाडांवरील फुटलेल्या बोंडांमधून कापूस वेचण्याचे काम सुरू आहे.

वेचणीसाठी अनेक गावांमध्ये १० ते १२ रुपये भाव द्यावा लागत आहे. आधीचा पिकासाठी केलेला खर्च वाया गेला असताना, आता उरलेला कापूस वेचण्यासाठीही शेतकऱ्यांना पदरमोड करण्याची वेळ आली आहे.

पालखीचे कर्डिलें व गाडेंकडून पूजन



जनता आवाज वृत्तसेवा

अहिल्यानगर : नवरात्र उत्सव तुळजापूर देवीच्या माहेरी बुऱ्हानगर मध्ये मोठया भक्तिभावाने साजरा होत आहे. दरवर्षी प्रमाणे नवरात्राच्या तिसऱ्या माळेला यात्रा भरवण्यात आली होती व गावात पालखी मिरवण्यात आली. प्रथम मिरवणुकीने आ.अक्षय कर्डिलें व महापौर ज्योती गाडे हे बहीण भाऊ मंदिरात आले देवीची पूजा केल्यावर आलेल्या पलंगाचे पूजन करून मिरवणूक सुरू करण्यात आली, अशी माहिती पालखीचे मानकरी सागर भगत यांनी दिली

युवा नेते संदीप कर्डिले,सरपंच रावसाहेब कर्डिले, उपसरपंच जालिंदर जाधव,रवी कर्डिले, सागर भगत,निलेश साळे,भाऊसाहेब कर्डिले, शांताराम कर्डिले, संतोष लवांडे, डॉक्टर राहुल भोसले, निलेश अवघडे आदींसह पालखीचे मुख्य मानकरी व बु-हाणनगर देवीचे पुजारी सुदाम जगन्नाथ भगत, ज्ञानेश्वर गोकुळ भगत, शिवराम उत्तम भगत,संतोष मधुकर भगत, देवीदास भिमराव भगत, सागर बाळासाहेब भगत, दिपक प्रभाकर भगत, वसंत गणपत भगत ग्रामस्थ उपस्थित होते.

बुऱ्हानगर आणि आई तुळजाभवानी यांचे नाते श्रद्धा, परंपरा आणि भक्तिभावाने जोडलेले आहे. आई तुळजाभवानीचे माहेरघर म्हणून या गावाची ओळख असून अनेक पिढ्यांपासून येथे पारंपरिक पद्धतीने नवरात्रोत्सव साजरा केला जातो. नवरात्राच्या तिसऱ्या माळेला आई तुळजाभवानीची पालखी बुऱ्हानगर येथील मंदिरात दाखल होते. या पालखीच्या दर्शनासाठी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहतात.

यंदाही पालखीच्या आगमनानिमित्त गावात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. ढोल-ताशांचा गजर, पारंपरिक वाद्यांचे सूर आणि आई तुळजाभवानीच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता.

प्रतिजैविकांच्या योग्य वापराबाबत जनजागृती

समर्थ फार्मसीसह पाच महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांचा सहभाग

जनता आवाज वृत्तसेवा

बेल्हे : जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त 'प्रतिजैविक प्रतिकारशक्तीविरुद्ध लढा' या संकल्पनेतून राजुरी (ता. जुन्नर) येथे भव्य फार्मासिस्ट रॅलीचे आयोजन करण्यात आले. समर्थ शैक्षणिक संकुलातील समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी व समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, बेल्हे यांच्यासह विविध फार्मसी महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी रॅलीत सहभागी होत प्रतिजैविकांचा योग्य वापर, औषधोपचारांबाबत जागरूकता आणि प्रतिजैविक प्रतिकारशक्तीचे दुष्परिणाम यांविषयी जनजागृती केली.

इंडियन फार्मास्युटिकल असोसिएशन (आयपीए), आळेफाटा स्थानिक शाखा, नॅशनल फार्मास्युटिकल वेल्फेअर असोसिएशन, जुन्नर, आंबेगाव व खेड तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन (संलग्न सीएपीडी, पुणे) तसेच समर्थ शैक्षणिक संकुल यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला.



या रॅलीमध्ये समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी, समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, विशाल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च, आळे, जय हिंद कॉलेज ऑफ फार्मसी, वडगाव सहानी आणि श्री स्वामी समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी, माळवाडी-बोटा येथील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समर्थ शैक्षणिक संकुलाचे विश्वस्त वल्लभ शेळके होते.


प्रमुख पाहुणे म्हणून केमिस्ट असोसिएशन, पुणेचे उपाध्यक्ष रमेशशेठ शेवाळे उपस्थित होते. शेळके यांनी फार्मासिस्टची सामाजिक जबाबदारी आणि औषधांच्या योग्य वापराबाबत जनजागृतीचे महत्त्व स्पष्ट केले. संतोष चोरडिया व डॉ. रूपाली थोरात यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी जुन्नर, आंबेगाव व खेड तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे सचिव महादेव तांबे, खजिनदार निलेश गांधी, ज्येष्ठ फार्मासिस्ट रायचंद गांधी, जुन्नर तालुका अध्यक्ष रसिक गांधी, आंबेगाव तालुका अध्यक्ष पंढरीनाथ तळेकर, खेड तालुका अध्यक्ष अतुल पिंगळे, सीएपीडी पुणेचे सदस्य महेश शिंदे आदी उपस्थित होते.

'अगस्ती' ४ लाख टन ऊस गाळप करणार

बॉयलर अग्निप्रदीपन उत्साहात; कामधेनू वाचविण्याचे आवाहन

जनता आवाज वृत्तसेवा

अकोले : अगस्ती सहकारी साखर कारखान्याच्या गळीत हंगामाचा बॉयलर अग्निप्रदीपन समारंभखासदार भाऊसाहेब वाकचौरे व आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या हस्ते पार पडला. यामुळे गळीत कारखान्याच्या हंगामाबाबतचा संभ्रम दूर झाला आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कारखान्याचे अध्यक्ष सीताराम गायकर होते. यंदाच्या गळीत हंगामात ४ लाख टन ऊस गाळपाचे उदिष्ट आहे.



कारखान्याच्या संदर्भात केंद्र व राज्य सरकार कडून जी मदत लागेल ती करण्याचा प्रयत्न आपण करू, अशी ग्वाही खासदार वाकचौरे यांनी यावेळी दिली. अगस्ती कारखाना तालुक्याची कामधेनू आहे. ती वाचविण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहन त्यांनी केले. भंडारदरा निळवंडे धरणाच्या पाण्याच्या उधळपट्टी संदर्भात तालुक्याचा भूमिपुत्र म्हणून आपण तालुक्यासोबत असल्याचे त्यांनी सांगितले. कारखाना रस्त्यावरील सील कोटसाठी २० लाखाचा निधी उपलब्ध केल्याचे त्यांनी सांगितले.

आमदार डॉ. लहामटे म्हणाले, दुष्काळजन्य परिस्थिती असल्याने सर्वच कारखान्यांपुढे अडचणी आहेत. कामगार आणि शेतकऱ्यांच्या त्यागावर अगस्ती सुरु आहे. अकोल्याच्या हक्काच्या पाण्यासाठी प्रसंगी रस्त्यावर उतरण्याची गरज आहे. बाळासाहेब भोर व मच्छिन्द्र धुमाळ यांनी निळवंडे धरणातून गेल्या महिनाभरापासून सुरु असणाऱ्या आवर्तनामुळे पाण्याची उधळपट्टी होऊन त्याचा फटका भविष्यात तालुक्याला बसण्याची चिन्हे दिसत आहेत, अशी भीती व्यक्त केली. वसंतराव मानकर, ज्येष्ठ नेते गिरजाजी जाधव, रिपब्लिकन नेते विजय वाकचौरे यांची भाषणे झाली.

अध्यक्षीय भाषणात गायकर यांनी कारखान्यापुढे असंख्य अडचणी असतांना कारखाना सुरु झाला पाहिजे ही सर्वांची इच्छा असल्याचे सांगितले. शेतकरी व कर्मचाऱ्यांचे थकीत देणी देण्यासाठी आगामी काळात प्रयत्न करणार आहे. राज्य सरकारने ह्यसॉफ्ट लोनह्व मंजूर केल्याने कारखान्याला दिलासा मिळाल्याचे ते म्हणाले. कारखाना जर बंद पडला तर पून्हा सुरु होणार नाही. त्यामुळे सर्वपक्षीय, शेतकरी यांनी सहकार्य करावे.

तरुणाला आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा

जनता आवाज वृत्तसेवा

सोनई : कामाचे पैसे मागितल्याच्या कारणावरून एका २० वर्षीय तरुणाला मारहाण करून मानसिक त्रास दिल्याने त्याने आत्महत्या केल्याचा आरोप करण्यात आला. या प्रकरणी शनिशिंगणापूर पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. मृत तरुणाच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी ही कारवाई केली आहे. परशेश्वर अंबादास शिरसाठ (वय २०, रा. विठ्ठलवाडी, गणेशवाडी, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर) असे मृत तरुणाचे नाव आहे. या प्रकरणात गोरक्षनाथ काशीद आणि कृष्णा काशीद या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. फिर्यादी भीमाबाई गोपीचंद तांदळे (वय ५५) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, १० ऑक्टोबर रोजी पहाटे चार वाजण्याच्या सुमारास शनिशिंगणापूर येथील लॉजिंगसमोर कामाच्या पैशांवरून वाद झाला. कामाचे पैसे मागितल्याच्या कारणावरून दोघांनी तरुणाला मारहाण करून मानसिक त्रास दिला आणि त्याला आत्महत्येस प्रवृत्त केले, असा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

ट्रकचालकावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा

आरोपीला अटक; मिसबा शेख मृत्यूप्रकरणी

जनता आवाज वृत्तसेवा

नेवासा : नेवासा फाटानेवासा रस्त्यावर ट्रकच्या धडकेत आठ महिन्यांच्या गर्भवती मिसबा वसीम शेख यांचा मृत्यू झाल्याप्रकरणी पोलिसांनी धडक कारवाई केली आहे. ट्रकचालकाने मद्यप्राशन करून बेदरकारपणे वाहन चालविल्याचा आरोप असून, वैद्यकीय तपासणीत मद्यप्राशनाचा अहवाल आल्यानंतर त्याच्याविरुद्ध सदोष मनुष्यवधासह विविध कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीला अटक करून न्यायालयाच्या आदेशाने नाशिक कारागृहात पाठविण्यात आल्याची माहिती नेवासा पोलिसांनी दिली.

दि.१० ऑक्टोबर रोजी नेवासा फाटानेवासा रस्त्यावरील आराध्या मंगल कार्यालयाजवळ हा अपघात झाला होता. मिसबा वसीम शेख या दुचाकीवरून घरी जात असताना पाठीमागून भरधाव वेगाने आलेल्या टाटा ट्रकने त्यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली. या अपघातात त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी त्यांचे चुलत दीर सहान आसिफ देशमुख (वय १९, रा. जुनी कोर्ट गल्ली, नेवासा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला होता. नेवासा पोलिसांनी ट्रकचालकाला ताब्यात घेऊन त्याची मद्यप्राशनाबाबत वैद्यकीय तपासणी केली.

त्यात त्याने मद्यप्राशन केल्याचा अहवाल प्राप्त झाल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. मद्यप्राशन करून वाहन चालविल्याने अपघात होऊन एखाद्याचा मृत्यू होऊ शकतो, याची जाणीव असतानाही निष्काळजीपणे वाहन चालविल्याचा ठपका ठेवत पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या तसेच मोटार वाहन कायद्याच्या विविध कलमन्वये कारवाई केली. आरोपीला अटक केल्यानंतर न्यायालयाच्या आदेशाने त्याची नाशिक कारागृहात रवानगी करण्यात आली.

आईच्या कष्टांना मिळाला सन्मानाचा मुकुट!

नीलम खताळ यांच्याकडून कष्टकरी मातांचा सन्मानपत्र देऊन गौरव

जनता आवाज वृत्तसेवा

संगमनेर : आईच्या कष्टांना यशाची किनार लाभते, तेव्हा तिच्या संघर्षाचे सार्थक होते. स्वतःच्या आयुष्यात कितीही संकटे आली, तरी मुलांच्या शिक्षणात कोणतीही कमतरता राहू नये, यासाठी अहोरात्र कष्ट करणाऱ्या गोरगरीब आणि कष्टकरी महिला या समाजाच्या खऱ्या नवदुर्गा आहेत. अशा तळागाळातील, मात्र प्रसिद्धीच्या झोतात कधीही न आलेल्या कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्याचा आगळावेगळा उपक्रम आमदार अमोल खताळ यांच्या पत्नी तथा आदिशक्ती फाउंडेशनच्या अध्यक्षा नीलम खताळ यांनी हाती घेतला आहे.



या उपक्रमाच्या अंतर्गत ज्या मातांनी आपल्या मुलांवर संस्कार करून त्यांना घडविले, त्यांचाच सन्मान त्यांच्या उच्चशिक्षित मुलांच्या हस्ते करण्यात येत आहे. नवरात्रोत्सवात देवीच्या विविध रूपांची पूजा केली जाते. मात्र, आपल्या घरात राहून मुलांच्या शिक्षणासाठी आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आयुष्य वेचणाऱ्या महिलांमधील आदिशक्तीची ओळख समाजाला व्हावी, या भावनेतून सौ नीलम खताळ यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत नीलम खताळ स्वतः नवदुर्गांच्या घरी जाऊन त्यांच्या उच्चशिक्षित मुलांच्या हस्ते सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव करीत आहेत.

हा सन्मान केवळ एका महिलेचा गौरव न राहता, आईच्या त्यागाची जाणीव मुलांना करून देणारा आणि कुटुंबातील प्रेम, कृतज्ञता व संस्कार अधोरेखित करणारा भावनिक सोहळा ठरत आहे.

आ. दातेंनी घेतली मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची भेट

सुपा एमआयडीसीतून पारनेर शहरास पाणी द्यावे

जनता आवाज वृत्तसेवा

पारनेर : दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पारनेर नगरपंचायत आणि नवनागापूर ग्रामपंचायतीला सुपा एमआयडीसीमधून पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी आमदार काशिनाथ दाते यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंद्रसिंह कुशवाह यांची मुंबई येथे प्रत्यक्ष भेट घेऊन चर्चा केली. या दोन्ही मागण्यांवर लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दिले.



याप्रसंगी जिल्हा बँकेचे संचालक तथा पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती प्रशांत गायकवाड उपस्थित होते. पारनेर नगरपंचायतीच्या सर्व नगरसेवकांनी काल आमदार दाते यांची भेट घेऊन सुपा एमआयडीसीमधून शहरासाठी पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. या मागणीची तातडीने दखल घेत आमदार दाते यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेऊन आवश्यक प्रशासकीय कार्यवाही करण्याची मागणी केली.

दरम्यान, नवनागापूर ग्रामपंचायतीसाठी दररोज १,९०० घनमीटर पाणी उपलब्ध करून देण्यासंदर्भातील प्रस्ताव ग्रामपंचायतीने यापूर्वीच सादर केला आहे. या प्रस्तावावर पुढील कार्यवाही करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. पारनेर नगरपंचायतीनेही पाणी उपलब्धतेसाठी आवश्यक प्रस्ताव लवकरात लवकर तयार करून संबंधित प्रादेशिक अधिकाऱ्यांकडे सादर करावा, जेणेकरून पुढील प्रशासकीय प्रक्रिया गतिमान होऊन निर्णय घेण्याचा मार्ग मोकळा होईल, अशी अपेक्षा आहे.

आमदार दाते यांनी नगरसेवकांच्या मागणीची तातडीने दखल घेत वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा केल्याने दोन्ही ठिकाणच्या पाणीप्रश्नाच्या सोडवणुकीसाठी महत्त्वपूर्ण पाऊल पडले आहे. आता प्रस्तावांवरील पुढील कार्यवाही आणि प्रत्यक्ष पाणी उपलब्धतेबाबत होणाऱ्या निर्णयाकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

झेन -झी कबीरांचा मानवतेच्या विचारांची

माजी मंत्री थोरात; अमृतवाहिनीतील कबीरवाणीला तरुणाईचा प्रतिसाद



मानवतेचा विचार महत्वाचा

डॉ.जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, संत कबीर यांनी सुमारे पाचशे वर्षांपूर्वी सांगितलेला मानवतेचा आणि समतेचा विचार हा आजच्या काळात सुद्धा अत्यंत महत्त्वाचा आहे. लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी हा विचार कायम जोपासला असून माणुसकी आणि मानवता धर्म वाढवण्यासाठी कबीर वाणी हा उपक्रम आयोजित करण्यात आले असल्याचे ते म्हणाल्या.

जनता आवाज वृत्तसेवा

संगमनेर : सध्या देशामध्ये धार्मिक आणि जातीपातीचे राजकारण सुरू आहे. जे तरुण पिढीला अजिबात मान्य नाही. या तरुणांना प्रगतशील व विज्ञानाचा देश हवा आहे. संतांचा समाज सुधारकांचा मानवतेचा मंत्र हवा आहे. मात्र काही राजकीय लोक तरुण पिढीला धर्माच्या नावावर पुन्हा मागे नेण्याचा प्रयत्न करत असून झेन- झी ही संत कबीरांच्या मानवतेच्या विचारांची असल्याचे प्रतिपादन माजी महसूल व शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले असून अमृतवाहिनीत झालेल्या कबीर वाणीला तरुणाईचा उदंड प्रतिसाद मिळाला.

अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालय येथे डॉ. जयश्रीताई थोरात यांच्या संकल्पनेतून कबीर कॅफे हा कबीर वाणीचा संगीतमय कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी कांचनताई थोरात, दुर्गाताई तांबे, रामहरी कातोरे, कार्यकारी विश्वस्त शरयूताई देशमुख, डॉ. जयश्रीताई थोरात, व्यवस्थापक प्रा. व्ही. बी. धुमाळ, प्राचार्य डॉ. प्रसाद बाविस्कर, डॉ बी एम लोंढे, प्रा. जी. बी काळे, डॉ. मच्छिंद्र चव्हाण, प्रा. विजय वाघे, नामदेव गायकवाड, विलास भाटे उपस्थित होते. संत कबीरवाणी संगीतमय कार्यक्रमात हभप विनोद राऊत, निलेश गायकवाड, प्रा. नानासाहेब गुंजाळ, कबीर भजन गायिका शरयू झंवर, जानवी झंवर, ईशा लिमये ,रिया पितळे, प्रथमेश बिडवे, प्रताप राऊत, अवधूत काळे, विशाल पाटील यांनी सहभाग घेऊन सुंदर कबीर वाणी सादर केली.

थोरात म्हणाले की, संत कबीरांचा विचार हा मानवतेचा आणि प्रेमाचा विचार आहे. माणसांवर आणि गरिबांवर प्रेम करा, पशुपक्ष्यांवर दया करा, भेदभाव करू नका हा संदेश त्यांनी दिला आहे. मानवधर्म हा विचार श्रेष्ठ असून तो कायम श्रेष्ठ राहणार आहे. कबीर कॅफे या मधून मानवतेचा विचार पुढे नेण्यासाठी चांगले काम होत आहे. सध्याच्या तरुण पिढीला प्रगतशील आणि विज्ञानवादी देश हवा आहे. मात्र राजकारणी लोक जातीपातीचे राजकारण करत आहेत भेदभाव करत आहेत. हे या झेनजीला मान्य नाही. त्यांना देशाला विज्ञानातून पुढे नेणारे विचार हवे आहेत. धार्मिकतेच्या नावावर मागे अनेक नेणारे नको. संत कबीरांचा मानवतेचा विचार हवा असून तो सर्वांनी पुढे घ्यावा असे आवाहन त्यांनी केले.

कोपरगाव-कोळपेवाडी रस्त्याचे उजळले भाग्य

आ. आशुतोष काळे यांच्या पाठपुराव्याला यश; केंद्राकडून १५ कोटींचा निधी

जनता आवाज वृत्तसेवा

कोळपेवाडी : कोपरगाव मतदारसंघातील महत्त्वाच्या कोपरगाव - कोळपेवाडी रस्त्याच्या मजबुतीकरणासाठी केंद्र शासनाकडून १५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असल्याची माहिती आ. आशुतोष काळे यांनी दिली. या निधीसाठी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून, लवकरच राज्य शासनाचीही मंजुरी मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.



कोपरगाव शहराशी जोडण्यात रस्त्याची महत्त्वाची भूमिका कोपरगाव - कोळपेवाडी आहे. धारणगाव-कुंभारी पूल उभारल्यानंतर या मार्गावरील वाहतुकीत मोठी वाढ झाली. परिणामी रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाल्याने नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत होता. या समस्येची दखल घेत आ. काळे यांनी रस्त्याच्या दुरुस्तीसाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा सुरू केला होता. काही दिवसांपूर्वी दिल्ली येथे नितीन गडकरी यांची भेट घेऊन त्यांनी निधीची मागणी केली होती. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत केंद्र शासनाने आता १५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. दरम्यान, महायुती शासनाच्या माध्यमातून एम डीआर-८५ वरील धारणगाव-म हेगाव देशमुख या सुमारे पाच किलोमीटर रस्त्यासाठी ४ कोटी २० लाख रुपयांचा निधीही मंजूर करून घेण्यात आला आहे. या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम लवकरच सुरू होणार असल्याचे आमदार काळे यांनी सांगितले.

नागरिकांनी मानले आ. काळेंचे आभार

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी तसेच महायुती शासनाचे आ. आशुतोष काळे यांनी मतदारसंघातील जनतेच्या वतीने आभार मानले. रस्त्याच्या प्रश्नासाठी पाठपुरावा करून निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल नागरिकांमध्ये सम ाधानाचे वातावरण असून, नागरिकांनी आ. काळे यांचे आभार व्यक्त केले.

कोपरगाव - कोळपेवाडी रस्त्याच्या मजबुतीकरणामुळे कुंभारी, धारणगाव, माहेगाव देशमुख, कोळपेवाडी, सुरेगाव आदी गावांतील नागरिकांना मोठा फायदा होणार आहे. विद्यार्थी, शेतकरी, व्यापारी तसेच दररोज प्रवास करणाऱ्या नागरिकांचा प्रवास अधिक सुरक्षित आणि सुरळीत होण्यास मदत होणार आहे.

तुळजाभवानी मंदिरात आज पंचकर्म शिबिर

जनता आवाज वृत्तसेवा

श्रीरामपूर : तालुक्यातील इंदिरानगर येथील आई तुळजाभवानी मंदिर भक्त मंडळाच्या वतीने महाराष्ट्र गोसेवा आयोग, महा एनजीओ फेडरेशन, पुणे आणि श्रीरामपूर आयुर्वेद असोसिएशन ऑफ प्रॅक्टिशनर्स यांच्या संयुक्त विद्यम ाने आज, दि. १५ ऑक्टोबर रोजी दुपारी २ ते ५ या वेळेत मोफत आरोग्य तपासणी व आयुर्वेदिक पंचकर्म शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

परिसरातील गरजू नागरिक व रुग्णांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

महा एनजीओ फेडरेशनचे सूरज सूर्यवंशी, प्रसन्न धुमाळ, राजेंद्र देसाई, आकाश मैड, जायभाय नाना यांच्या विशेष प्रयत्नातून या उपक्रमाला पुढाकार मिळाला आहे. श्रीरामपूर आयुर्वेदिक पंचकर्म हॉस्पिटलचे डॉ. सतीश भट्टड यांचे शिबिरासाठी विशेष सहकार्य लाभले आहे. शेखर मुंदडा यांच्या मार्गदर्शन व सहकार्याने हा सामाजिक उपक्रम साकारत आहे.

शिबिराच्या सम ारोपप्रसंगीअप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, डॉ. सतीश भट्टड, डॉ. प्रमोद गाडे, राजेंद्र देसाई, सूरज सूर्यवंशी व प्रसन्न धुमाळ यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

आकारीपडीतांच्या जमिनींचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

हरेगाव शेती महामंडळ कार्यालयासमोर संतप्त शेतकऱ्यांचा फलक

जनता आवाज वृत्तसेवा

श्रीरामपूर : तालुक्यातील महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या हरेगाव मळा कार्यालयासमोर मंगळवारी सकाळी लावण्यात आलेल्या एका फलकामुळे आकारीपडीत शेतकऱ्यांच्या जमिनींचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे. आकारीपडीत शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी प्राधान्याने परत देण्यासाठी महसूल विभागाने आवश्यक शासन निर्णय अथवा आदेश काढावेत, अशी मागणी या फलकाद्वारे करण्यात आली आहे.



आकारीपडीत शेतकऱ्यांच्या जमिनींच्या प्रश्नावर अद्याप ठोस निर्णय झालेला नसताना दुसरीकडे ग्लोबल डिफेन्स इंडस्ट्रीज लिमिटेडसह इतर संस्थांना शेती महामंडळाच्या जमिनी निविदा प्रक्रियेद्वारे देण्याची कार्यवाही सुरू असल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे शेतकरी वर्गात नाराजी आणि असंतोष वाढत असल्याचे चित्र आहे.

मंत्र्यांकडून वेळोवेळी आश्वासने मिळतात; मात्र प्रत्यक्ष निर्णय होत नसल्याबद्दल शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. पालकमंत्र्यांनी आकारीपडीत जमिनी शेतकऱ्यांना दिल्याशिवाय कोणताही प्रकल्प सुरू होणार नाही, अशी भूमिका स्पष्ट केल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. असे असताना जमिनींच्या वाटपासाठी निविदा किंवा अन्य प्रक्रिया सुरू होत असल्याने शासनाच्या भूमिकेबाबत प्रश्न उपस्थित केला जात आहे.

शेती महामंडळाच्या कार्यालयासमोर लावलेल्या फलकावर शेतकऱ्यांच्या भावना तीव्र शब्दांत व्यक्त करण्यात आल्या आहेत. दरम्यान, विजयादशमीच्या पार्श्वभूमीवर जाहीर निविदेच्या धर्तीवर फलकावर उपरोधिक मजकूरही प्रसिद्ध करण्यात आला आहे. नऊ गावांतील आकारीपडीत शेतकरी कुटुंबे ४९ वर्षांच्या कराराने देणे आहे.

शासनाने तातडीने निर्णय घ्यावा

आकारीपडीत शेतकऱ्यांच्या जमिनींचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याने या प्रश्नावर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. दरम्यान, हरेगाव येथील या फलकानंतर महाराष्ट्र शासन याबाबत काय भूमिका घेते? याकडे शेतकरी आणि परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

दुष्काळ निवारणासाठी प्रशासनाची धावपळ

ग्रामसभेत पुढील ८ ते १० महिन्यांच्या उपाययोजनांचे नियोजन

जनता आवाज वृत्तसेवा

वाळकी : महाराष्ट्रासाठी दुष्काळ ही नवीन परिस्थिती नाही. पाऊस कमी झाल्यानंतर त्याचा सर्वाधिक फटका शेतीला बसतो. त्यानंतर पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा, रोजगार आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीवर त्याचे गंभीर परिणाम होतात. याच पार्श्वभूम ीवर अहिल्यानगर तालुक्यातील गुंडेगाव येथे पुढील आठ ते दहा महिन्यांच्या दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी विशेष ग्राम सभेचे आयोजन करण्यात आले.

सोमवारी (दि. १२) प्रशासक अधिकारी सचिन चौधरी व ग्रामविकास अधिकारी सचिन शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या ग्रामसभेत गावातील पाणीटंचाई, जनावरांचा चारा, रोजगार आणि जलसंधारणाच्या विविध उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

गावातील वाडी-वस्त्यांवर टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे, वृक्षतोडीला आळा घालणे, जनावरांसाठी चारा छावण्या सुरू करण्याबाबत पाठपुरावा करणे, गावातील तलावांच्या सीमा निश्चित करून अतिक्रमण झालेल्या भागाबाबत संबंधितांना नोटिसा देणे, तलावातील गाळ काढणे, रोजगार हमी योजनेतून रस्ते, बांधबंदिस्ती व सांडवा दुरुस्तीची कामे हाती घेणे, तसेच दसरा-दिवाळीच्या पार्श्वभूमीवर गावात आवश्यक ठिकाणी पथदिवे बसविणे, अशा विविध विषयांवर ग्रामसभेत चर्चा झाली.



गुंडेगाव येथे लवकरच पाणीपुरवठा करण्यासाठी टँकरचा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून नागरिकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. जंगली हिंस्र प्राण्यांपासून नागरिकांचे संरक्षण व्हावे यासाठी वाडी-वस्त्यांवर आवश्यक त्या ठिकाणी पथदिवे बसविण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. तसेच पाणीसाठा वाढविण्यासाठी मुख्य तलावातील गाळ काढण्याबाबतही प्रयत्न करण्यात येणार आहेत.

- सचिन शिंदे, ग्रामविकास अधिकारी, गुंडेगाव

श्रीरामपूर दिगंबर जैन मंदिरात

नवरात्रोत्सवाची भक्तिमय पर्वणी

जनता आवाज वृत्तसेवा

श्रीरामपूर : येथील दिगंबर जैन मंदिरात नवरात्रोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पद्मावती मातेची घटस्थापना करण्यात आली असून, नवरात्रोत्सवाच्या काळात भाविकांसाठी दररोज धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. अशी माहिती सम ाजाचे अध्यक्ष संजय कासलीवाल यांनी दिली.

नवरात्रोत्सवानिमित्त दररोज सकाळी पंचामृत अभिषेक, तसेच रात्री ८.३० वाजता मूलनायक श्री १००८ पार्श्वनाथ भगवानजी आणि पद्मावती मातेची संगीतमय महाआरती करण्यात येत आहे.

बुधवार, १४ ऑक्टोबर रोजी दुपारी २.३० वाजता पद्मावती मातेचे महापूजन आयोजित करण्यात आले आहे. यावेळी मातेला वस्त्र परिधान करण्याचा मान सौ. संगीता कासलीवाल, मंगळसूत्र अर्पण करण्याचा मान श्रद्धा कासलीवाल, हळदी-कुंकवाचा मान सरला गोधा, हार अर्पण करण्याचा मान पुष्पाबाई गोधा, तेलदीप प्रज्वलित करण्याचा मान नगीना पांडे, तर प्रसाद वाटपाचा मान पूजा, लीना, वैशाली पांडे परिवाराला मिळाला आहे.

या धार्मिक कार्यक्रमांचा भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन समाजाचे अध्यक्ष संजय कासलीवाल, उपाध्यक्ष राजेंद्र झांजरी, सचिव नितीन मिरिकर, खजिनदार महावीर पाटणी, विश्वस्त संजय चुडीवाल, प्रकाश पांडे, योगेश गंगवाल, सुनील बाकलीवाल, मनोज पापडीवाल, मयूर पाटणी, विक्रांत गंगवाल, चंदना महिला मंडळाच्या अध्यक्षा रेखा पाटणी, त्रिशला बहू मंडळाच्या अध्यक्षा संगीता कासलीवाल तसेच पंचामृत अभिषेक ग्रुपच्या वतीने करण्यात आले आहे.

पारनेरमध्ये टँकर, चारा छावण्या सुरू करा

आ. दातेंची उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे मागणी

जनता आवाज वृत्तसेवा

पारनेर : पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील दिवसेंदिवस गंभीर होत चाललेल्या दुष्काळी परिस्थितीची दखल घेत आ. काशिनाथ दाते यांनी काल, बुधवारी मुंबई येथे उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी मतदारसंघातील पाणीटंचाई, शेतकरी, सर्वसामान्य नागरिक आणि पशुपालकांच्या समस्यांकडे उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधून घेत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. यावेळी जिल्हा बँकेचे माजी संचालक प्रशांत गायकवाड उपस्थित होते.

पारनेर-नगर मतदारसंघातील अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता आहे. नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागू नये, यासाठी आवश्यक त्या ठिकाणी तातडीने पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरू करावेत. तसेच पाणीटंचाई निवारणासाठी आवश्यक असलेल्या इतर उपाययोजनांनाही गती द्यावी, अशी आग्रही मागणी आ. दाते यांनी केली.

दरम्यान, दुष्काळाचा परिणाम पशुधनावरही होत असून जनावरांसाठी पुरेसा चारा उपलब्ध होण्याचे आव्हान निम ाण झाले आहे. पशुपालकांसमोर आर्थिक संकट उभे राहू नये आणि पशुधनाचे संगोपन करता यावे, यासाठी मतदारसंघात चारा छावण्या अथवा चारा डेपो तातडीने सुरू करावेत, अशी मागणीही आ. दाते यांनी उपमुख्यमंत्र्यांकडे केली.



दुष्काळाच्या कठीण काळात नागरिकांना पिण्याचे पाणी आणि पशुधनाला चारा उपलब्ध करून देणे ही केवळ प्रशासकीय जबाबदारी नसून ग्रामीण जनजीवन टिकवून ठेवण्याची गरज आहे. पाणीटंचाई वाढण्यापूर्वीच टँकर, चारा छावण्या आणि अन्य आवश्यक उपाययोजना सुरू करून प्रशासनाने नागरिकांना दिलासा द्यावा.

- आ. काशिनाथ दाते

कुकाणे हायस्कूलला मधू कांबीकरांचे योगदान

देसाई देशमुख; कुकाणा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात कांबीकरांना श्रद्धांजली

जनता आवाज वृत्तसेवा

नेवासा तालुका : कला क्षेत्राबरोबरच वाचनालय, शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या ज्येष्ठ अभिनेत्री मधू कांबीकर यांच्या माध्यमातून कुकाणे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या इमारत बांधकामासाठी तीन लाख रुपयांची आर्थिक मदत झाली होती, अशी माहिती ग्रामसेवा मंडळाचे अध्यक्ष देसाई देशमुख यांनी दिली.

कुकाणे येथील ग्रामसेवा मंडळ संचलित कुकाणा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मंगळवारी (दि. १३) दिवंगत ज्येष्ठ अभिनेत्री मधू कांबीकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी देसाई देशमुख बोलत होते.

याप्रसंगी लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष काकासाहेब नरवडे, सरव्यवस्थापक रवींद्र मोटे, कामगार संचालक सुखदेव फ ुलारी, प्राचार्या सुजाता अंबुले, उपप्राचार्य नामदेव वाघमोडे, पर्यवेक्षक पांडुरंग बडे यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

कुकाणे हायस्कूलच्या इमारत बांधकामासाठी निधी उभारण्याच्या उद्देशाने मधू कांबीकर यांचा नाट्यप्रयोग आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यावेळी म धू कांबीकर आणि कुलदीप पवार यांच्या प्रमुख भूमिका असलेला टोपी खाली दडलं काय? हा नाट्यप्रयोग आयोजित करण्यात आला. त्यासाठी दीड लाख रुपये मानधन निश्चित करण्यात आले होते. तिकीट विक्रीतून दोन

रामेश्वर भापकरांची सन्मानासाठी निवड

जनता आवाज वृत्तसेवा

शेवगाव : व्यवसायात गुणवत्ता, विश्वासार्हता आणि ग्राहकांशी जिव्हाळ्याचे संबंध या त्रिसूत्रीला प्राधान्य देत यशस्वी वाटचाल करणारे आयकॉन स्टीलचे डीलर रामेश्वर भापकर यांनी आपल्या कार्यातून व्यावसायिक क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे. जनसंपर्काच्या बळावर व्यवसायवृद्धी साधत ग्राहकांचा विश्वास संपादन केल्याबद्दल त्यांची सन्मानासाठी निवड करण्यात आली आहे.

बांधकाम क्षेत्रात स्टीलला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. या क्षेत्रातील ग्राहकांना दर्जेदार साहित्य उपलब्ध करून देण्याबरोबरच त्यांच्या गरजा समजून घेणे, योग्य उत्पादनांची माहिती देणे आणि वेळेवर सेवा देणे यावर भापकर यांचा विशेष भर आहे. पारदर्शक व्यवहार, गुणवत्तापूर्ण सेवा आणि विश्वासार्हता ही त्यांच्या व्यवसायाची प्रमुख वैशिष्ट्ये ठरली आहेत.

व्यवसाय करताना केवळ आर्थिक नफ्याला प्राधान्य न देता ग्राहकांचे समाधान आणि दीर्घकालीन व्यावसायिक संबंध जपण्यावर त्यांनी भर दिला आहे. बांधकाम क्षेत्रातील बदलत्या गरजा लक्षात घेऊन ग्राहकांना योग्य मार्गदर्शन देत त्यांच्या अपेक्षांनुसार सेवा उपलब्ध करून दिल्याने भापकर यांनी ग्राहकांच्या मनात विश्वासाचे स्थान निर्माण केले आहे.

जनसंपर्क हे व्यवसायवृद्धीचे प्रभावी माध्यम ठरू शकते, हे त्यांच्या व्यावसायिक वाटचालीतून स्पष्ट होते. ग्राहक, बांधकाम व्यावसायिक तसेच व्यवसायाशी संबंधित विविध घटकांशी सातत्याने संपर्क ठेवत त्यांनी आपल्या व्यवसायाचा पाया मजबूत केला आहे. प्रामाणिकपणा, मेहनत, सातत्य आणि ग्राहककेंद्री दृष्टिकोन यांच्या जोरावर त्यांनी व्यावसायिक क्षेत्रात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

विद्यार्थ्यांना स्वच्छता, पर्यावरणाचे धडे

जनता आवाज वृत्तसेवा

अहिल्यानगर : स्वच्छ सर्वेक्षण २०२६ आणि माझी वसुंधरा अभियान ७.० अंतर्गत अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने शहरातील विविध शाळांम ध्ये विद्यार्थ्यांसाठी स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि पर्यावरण संवर्धनाबाबत व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. लहान वयापासूनच विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता व पर्यावरणपूरक सवयी रुजविणे आणि त्यांना पर्यावरण संवर्धनाच्या उपक्रमात सक्रिय सहभागी करून घेणे, हा या म ोहिमेचा प्रमुख उद्देश आहे.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना ओला व सुका कचरा वर्गीकरण, प्लास्टिकचा वापर टाळणे, घरगुती कंपोस्टिंग तसेच ३ आर (कमी वापर, पुनर्वापर आणि पुनर्चक्रण) या तत्त्वांची माहिती देण्यात येत आहे. दैनंदिन जीवनात निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन कसे करावे, ओल्या कचऱ्यापासून सेंद्रिय खत कसे तयार करावे आणि सुक्या कचऱ्याचे स्वतंत्र संकलन करून त्याचा पुनर्वापर व पुनर्चक्रण कसे करता येते, याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जात आहे.

एकल वापराच्या प्लास्टिकचा वापर टाळून पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारण्याचे महत्त्वही विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात येत आहे.

'ब्रिक्स'च्या आंतरराष्ट्रीय मंचावर संगमनेरी योगवैभव!

अहमदाबादेत घडवले योगपरंपरेचे दर्शन; ध्रुव ग्लोबलच्या दहा जणांचा सहभाग

जनता आवाज वृत्तसेवा

संगमनेर : भारतीय संस्कृतीचा प्राचीन वारसा, शारीरिक चापल्य, मानसिक एकाग्रता आणि देहबोलीतून साकारणाऱ्या कलात्मकतेचा वैश्विक आविष्कार घडविणाऱ्या 'ब्रिक्स पारंपरिक व स्वदेशी खेळांच्या आंतरराष्ट्रीय म होत्सवात' संगमनेरच्या ध्रुव ग्लोबल स्कूलने अभिमानास्पद ठसा उमटविला. अहमदाबाद येथे पार पडलेल्या या आंतरराष्ट्रीय सोहळ्यात भारताच्या योगासन प्रात्यक्षिकांसाठी महाराष्ट्राच्या १५ खेळाडूंच्या पथकाची निवड करण्यात आली होती. त्यामध्ये संगमनेरच्या ध्रुव ग्लोबल स्कूलम धील आठ विद्यार्थ्यांसह पुण्यातील ध्रुवच्या विद्यार्थिनीचा आणि याच शाळेच्या एका माजी विद्यार्थिनीचाही समावेश होता. त्यामुळे जागतिक व्यासपीठावर भारतीय योगपरंपरेचे दर्शन घडविण्याबरोबरच संगमनेरच्या शैक्षणिक आणि क्रीडाक्षेत्रातील गुणवत्तेनेही आंतरराष्ट्रीय स्तरावर मोहोर उमटवली आहे.



भारताच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय युवा व्यवहार व क्रीडा मंत्रालय आणि गुजरात सरकारच्या संयुक्त विद्यमाने अहमदाबादम धील वीर सावरकर क्रीडा संकुलात या महोत्सवाचे करण्यात आले होते. पारंपरिक खेळांचे जतन, विविध देशांच्या सांस्कृतिक वारशाचे संवर्धन, परस्पर सामंजस्य आणि आंतरराष्ट्रीय मैत्री वृद्धिंगत करणे, हा या उपक्रमाचा मूलभूत उद्देश होता. या स्पर्धेचे स्वरूप पदकांसाठीच्या चुरशीपेक्षा पारंपरिक खेळांचे प्रात्यक्षिक, सांस्कृतिक देवाणघेवाण आणि ज्ञानाचे आदानप्रदान यावर केंद्रित होते.

योग ही भारताची प्राचीन ज्ञानपरंपरा असून, तिचे जागतिक स्तरावर क्रीडारुपाने संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. योगासनांच्या प्रसारासाठी संस्थात्मक कार्य, संशोधन आणि गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण यांची सांगड घालण्याचा आम चा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे. ध्रुव ग्लोबल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी ब्रिक्सच्या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर भारतीय योगपरंपरेचे प्रतिनिधित्व करणे, ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना योग्य दिशा आणि संधी दिल्यास ते जागतिक स्तरावरही आपली गुणवत्ता सिद्ध करु शकतात, याचा हा प्रत्यय आहे.

- डॉ.संजय मालपाणी, चेअरमन - ध्रुव ग्लोबल स्कूल

जगभर आंदोलनांची धग; लोकशाहीसमोर विश्वासाचे नवे आव्हान

मतदारयादी, शिक्षण, घरांचा प्रश्न, महागाई आणि नेतृत्वावरील अविश्वासामुळे अनेक देशांत नागरिक रस्त्यावर

जनता आवाज वृत्तसेवा

श्रीरामपूर : भारतापासून युरोपपर्यंत आणि पाकिस्तानपासून इस्त्रायलपर्यंत जगभरात आंदोलनांची लाट उसळली आहे. कुठे म तदारयाद्यांच्या पुनरीक्षणावरून लोकशाही प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित होत आहेत, तर कुठे शिक्षण, घरांचा प्रश्न, महागाई, राजकीय नेतृत्व आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या मुद्द्यांवर नागरिक रस्त्यावर उतरले आहेत. वेगवेगळ्या कारणांनी पेटलेली ही आंदोलने एक समान संदेश देत आहेतलोकशाही केवळ निवडणुकांवर टिकत नाही, तर नागरिकांच्या विश्वासावर उभी असते.



भारतात सध्या मतदारयादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रियेवरून राजकीय वाद सुरू आहे. मतदारयादीतील पारदर्शकता आणि मतदानाच्या अधिकाराच्या संरक्षणाचा मुद्दा विरोधकांकडून उपस्थित केला जात आहे. दुसरीकडे, निवडणूक प्रक्रियेची शुद्धता आणि अचूक मतदारयादी हेही तितकेच महत्त्वाचे असल्याचा सत्ताधाऱ्यांचा युक्तिवाद आहे. या वादात पारदर्शक प्रक्रिया आणि तक्रार निवारणाची विश्वासार्ह यंत्रणा उभारणे ही काळाची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे. फ्रान्स आणि चिलीमध्ये शिक्षणविषयक धोरणे, निधी आणि सुधारणांच्या विरोधात विद्यार्थी आणि शिक्षकांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे. शिक्षणावरील खर्चात कपात, शिक्षकांच्या समस्या आणि विद्यार्थ्यांना समान संधी या मुद्द्यांवर सरकारविरोधात नाराजी वाढत आहे. शिक्षण हा खर्च नसून देशाच्या भविष्यातील गुंतवणूक असल्याची भूमिका आंदोलनांतून ठळकपणे पुढे आली आहे.

स्पेनमध्ये घरांच्या वाढत्या किमती, महागलेले भाडे आणि बेदखलीच्या वाढत्या घटनांमुळे नागरिक संतप्त झाले आहेत. परवडणारे घर ही साम ान्य नागरिकांची मूलभूत गरज असताना, वाढत्या महागाईमुळे ती पूर्ण करणे अधिकाधिक कठीण होत असल्याने सरकारवर दबाव वाढत आहे. ब्रिटनमध्ये पॅलेस्टिनी नागरिकांच्या समर्थनार्थ तसेच विविध राजकीय विचारसरणींच्या समर्थन-विरोधात निदर्शने सुरू आहेत. आंतरराष्ट्रीय संघर्षाचा परिणाम देशांतर्गत राजकारणावरही होत असल्याचे या घटनांनी स्पष्ट केले आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य टिकवून ठेवताना हिंसाचार आणि द्वेषपूर्ण प्रचार रोखण्याचे आव्हान सरकारसमोर उभे राहिले आहे. पाकिस्तानमध्ये माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या सुटकेच्या मागणीवरून संघर्ष अधिक तीव्र झाला आहे. राजकीय अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर कठोर प्रशासकीय निर्णय घेतले जात असून लोकशाही संस्थांच्या स्वायत्ततेवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

इस्त्रायलमध्ये ७ ऑक्टोबर २०२३ च्या दहशतवादी हल्ल्यानंतर सुरक्षा यंत्रणेचे अपयश आणि पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्या नेतृत्वावर नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. राष्ट्रीय सुरक्षेच्या प्रश्नांवरही सरकारला उत्तरदायित्वापासून सूट मिळू शकत नाही, हा संदेश तेथील आंदोलनांतून अधोरेखित झाला आहे. या सर्व घटनांमधून एक बाब स्पष्ट होते. सरकारचे निर्णय कितीही महत्त्वाचे असले, तरी त्यामागील कारणे नागरिकांना समजावून सांगणे, निर्णयप्रक्रियेत पारदर्शकता ठेवणे आणि तक्रारींना वेळेत प्रतिसाद देणे आवश्यक आहे. आंदोलनांकडे केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून पाहून चालणार नाही; ती नागरिकांच्या अपेक्षा, असंतोष आणि व्यवस्थेतील उणिवांचे प्रतिबिंब असतात.

जगभरातील आंदोलनांनी सत्ताधाऱ्यांना स्पष्ट संदेश दिला आहे. संवाद, विश्वास आणि उत्तरदायित्व यांची जागा केवळ कठोर कारवाई घेऊ शकत नाही. लोकशाही मजबूत ठेवायची असेल, तर सरकारने नागरिकांचे म्हणणे ऐकणे आणि नागरिकांनीही शांततापूर्ण, संविधानिक मार्गाने आपली भूमिका मांडणे, हीच पुढील काळातील खरी गरज ठरणार आहे.

सहा वर्षांची मायरा ठरली विक्रमवीर

स्केटिंगमध्ये सहा जागतिक विक्रमांची नोंद



जनता आवाज वृत्तसेवा

लिंपणगाव : वय अवघे सहा वर्षे... मात्र कर्तृत्व जागतिक स्तरावरील! श्रीगोंदा तालुक्यातील आनंदवाडी येथील मायरा सोनाली निलेश जाधव हिने स्केटिंग क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर मायराने जागतिक स्तरावर आपली वेगळी ओळख निम ण केली आहे.

कर्नाटकातील बेळगाव येथे ३१ मे २०२६ रोजी झालेल्या स्केटिंग स्पर्धेत मायराने १०० मीटर फास्टेस्ट बॅकवर्ड इनलाइन स्केटिंग प्रकारात अवघ्या १७.९३ सेकंदांत अंतर पूर्ण करत गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड आपल्या नावावर केला. मायराच्या नावावर आतापर्यंत सहा वेगवेगळ्या जागतिक विक्रमांची नोंद झाली आहे. याम ध्ये गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड, युनायटेड नेशन्स वर्ल्ड रेकॉर्ड, कॉन्टिनेन्टल वर्ल्ड रेकॉर्ड, ग्लोबल टॅलेंट बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स, युनिव्हर्सल स्पोर्ट्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स आणि एलिट लेजेंड्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स यांचा समावेश आहे. राष्ट्रीय स्तरावरील विविध स्केटिंग स्पर्धांमध्येही मायराने सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदकांची कमाई केली आहे. वेग, संतुलन आणि तंत्रावर प्रभुत्व मिळवण्यासाठी तिने केलेला नियमित सराव आणि मेहनत तिच्या यशामागील प्रमुख कारण ठरले आहे. मायराच्या या यशामागे तिचे पालक, प्रशिक्षक आणि एस. बी. के. स्केटिंग अकॅडमी यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले आहे.

मायरा ही आनंदवाडीचे माजी सरपंच मच्छिंद्र जाधव यांची नात आहे. तिच्या यशाबद्दल माजी मंत्री बबनराव पाचपुते, माजी आमदार राहुल जगताप, सहकार महर्षी नागवडे कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे, शिवसेना ठाकरे गटाचे राज्य उपनेते साजन पाचपुते, सहकार महर्षी काष्टी संस्थेचे अध्यक्ष राकेश पाचपुते, जिल्हा परिषद सदस्या पंचशिला रमेश गिरमकर, मेजर शिवाजी नलवडे, महेंद्र गिरमकर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

गोंडेगावात सोलर प्रकल्पाला ग्रामस्थांचा विरोध

जनता आवाज वृत्तसेवा

गोंडेगाव : सोलर कंपनीच्या कामावरून नेवासा तालुक्यातील गोंडेगाव येथे ग्राम स्थांमध्ये नाराजी निर्माण झाली असून, मेंढपाळांच्या पारंपरिक चराई क्षेत्राच्या वापरावरून वाद निर्माण झाला आहे. दुष्काळी परिस्थितीत पशुधनाच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर असताना चराईसाठी वापरले जाणारे क्षेत्र सोलर प्रकल्पासाठी कसे उपलब्ध करून देण्यात आले, असा सवाल उपस्थित करत ग्रामस्थांनी कंपनीच्या कामाला विरोध दर्शविला आहे.



गावातील महिला, पुरुष, सरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांनी एकत्र येत या प्रश्नावर भूमिका स्पष्ट केली आहे. संबंधित जागेची मालकी, तिचा पूर्वीचा वापर, तसेच सोलर प्रकल्पासाठी जमीन उपलब्ध करून देताना झालेली प्रक्रिया याची प्रशासनाने सखोल चौकशी करावी, अशी मागणी ग्राम स्थांकडून करण्यात येत आहे. मेंढपाळांचा व्यवसाय हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग असून, चराई क्षेत्र कमी झाल्यास पशुपालकांच्या उपजीविकेवर परिणाम होण्याची भीती ग्राम स्थांनी व्यक्त केली आहे.

कंपनीकडून पोलिसांना पाचारण; ग्रामस्थ ठाम

दरम्यान, सोलर कंपनीने घटनास्थळी पोलिसांना बोलावले होते. पोलिसांनी ग्रामस्थांना शांतता राखण्याचे आवाहन केले. मात्र, ग्रामस्थांनी संबंधित ठिकाणी काम सुरू करू नये, अशी ठाम भूमिका घेतली. काम सुरू राहिल्यास आंदोलनाची भूमिका घ्यावी लागेल, असा इशाराही देण्यात आला. पोलिस बंदोबस्त कोणत्या आदेशाच्या आधारे मागविण्यात आला होता, याबाबत स्पष्ट माहिती मिळालेली नसल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. याबाबत प्रशासनाने वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी होत आहे.

'गरज पडल्यास जेलभरो आंदोलन'

प्रहार जनशक्ती पक्षाचे युवक जिल्हाध्यक्ष ॲड. पांडुरंग केशव औताडे यांनी ग्रामस्थांच्या भूमि केला पाठिंबा दिला आहे. ते म्हणाले, ''दुष्काळी परिस्थितीत जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर असताना चराई क्षेत्र सोलर कंपनीला देण्यात आलेच कसे? मेंढपाळ आणि ग्रामस्थांच्या उपजीविकेचा प्रश्न प्रशासनाने गांभीर्याने घ्यावा. न्याय मिळाला नाही तर ग्रामस्थांसोबत जेलभरो आंदोलन करण्यात येईल.'' प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून जमिनीची कायदेशीर स्थिती, चराई क्षेत्राचा वापर आणि सोलर प्रकल्पासाठी देण्यात आलेल्या परवानग्यांची तपासणी करावी, अशी मागणी त्यांनी केली.

तहसीलदारांशी संपर्काचा प्रयत्न केल्याचा दावा

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, या प्रश्नाबाबत तहसीलदारांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला; मात्र प्रतिसाद मिळाला नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. त्यामुळे प्रशासन या प्रश्नाकडे किती गांभीर्याने पाहणार, असा सवाल उपस्थित होत आहे. गोंडेगाव येथील चराई क्षेत्राचा प्रश्न, ग्रामस्थांचा विरोध आणि सोलर कंपनीच्या कामाबाबत प्रशासनाची पुढील भूमिका काय राहणार, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

चराई क्षेत्राच्या प्रश्नावरून संघर्षाची चिन्हे

जिल्हास्तरीय पेंचक सिलॅट स्पर्धेत दीडशेहून अधिक खेळाडूंचा सहभाग



जनता आवाज वृत्तसेवा

श्रीरामपूर : संस्कार स्पोर्ट्स क्लब व अहिल्यानगर पेंचक सिलॅट असोसिएशनच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय खुल्या पेंचक सिलॅट स्पर्धा रविवारी उत्साहात पार पडल्या. जिल्ह्याच्या विविध भागांतील दीडशेहून अधिक खेळाडूंनी स्पर्धेत सहभाग घेत उत्कृष्ट कौशल्याचे प्रदर्शन केले.

स्पर्धेचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते रोहन डावखर यांच्या हस्ते झाले. यावेळी बोलताना त्यांनी, खेळ आणि नियमित व्यायाम हे मानसिक व शारीरिक आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रत्येकाने खेळांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. शिस्त, मेहनत आणि सातत्य या गुणांच्या बळावरच यश मिळते, असेही त्यांनी सांगितले. स्पर्धेतील विविध गटांमध्ये खेळाडूंनी चुरशीच्या लढती देत स्पर्धेला रंगत आणली. ग्रामीण भागातील खेळाडूंना स्पर्धात्मक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने या स्पर्धेचे महत्त्व अधोरेखित झाले.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी क्रीडा शिक्षक अमोल गिरमे, ऋषिकेश नवले, नारायण झांबरे, शिवराज वाकचौरे, राधिका खरात, वीरेंद्र खरे, रोहित हिवाळे, उमेश झुटिंग, संस्कार शेलार, शशिकांत नवगिरे, प्रेम खेमणर, राजेंद्र आढाव (मेजर), जयश्री कुदळे तसेच संस्कार स्पोर्ट्स क्लबचे संस्थापक व मुख्य प्रशिक्षक प्रवीण कुदळे यांनी विशेष परिश्रम घेतले. बक्षीस वितरण समारंभास माजी सरपंच प्रणिताताई भगत, क्रीडा शिक्षक अमोल गिरमे, प्रवीण कुदळे, राजेंद्र आढाव (मेजर), ऋषिकेश नवले, शशिकांत नवगिरे, सौ. नवगिरे मॅडम, जलतरण प्रशिक्षक साळुंके सर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थितांनी आयोजकांचे अभिनंदन केले. अशा स्पर्धांमुळे ग्रामीण भागातील खेळाडूंना राष्ट्रीय स्तरावर झेप घेण्यासाठी आवश्यक व्यासपीठ उपलब्ध होत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

मुलगी दाखवण्याच्या बहाण्याने ४० हजारांची फसवणूक

जनता आवाज वृत्तसेवा

निरगुडसर : मुलाच्या लग्नासाठी मुलगी दाखवण्याच्या बहाण्याने एका कुटुंबाची ४० हजार रुपयांची आर्थिक फसवणूक झाल्याची तक्रार घोडेगाव पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. लग्न जुळवून देण्याचे आमिष दाखवून पैसे घेतल्यानंतर विवाहानंतर नववधूला घेऊन गेल्याचा आरोप तक्रारदाराने केला आहे. या प्रकरणी दोन महिलांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी घोडेगाव येथील सूर्यकांत काळे यांनी फिर्याद दिली आहे. त्यांचा मुलगा विवाहासाठी इच्छुक असल्याने ते मुलगी पाहत होते. त्यावेळी त्यांच्या पत्नीच्या ओळखीच्या नसिम शहाबुद्दीन मुंढे या महिलेने तिची बहीण पुणे येथे लग्न जुळवण्याचे काम करीत असल्याचे सांगितले. मुलासाठी मुलगी पाहून देण्याचे आश्वासन देत त्यासाठी पैसे लागतील, असेही तिने सांगितले. फिर्यादीनुसार, ९ फेब्रुवारी २०२६ रोजी नसिम मुंढे ही महिला काळे यांच्या घरी आली. तिची बहीण आमिना सय्यद हिने मुलासाठी मुलगी पाहिली असून मुलीचा फोटो पाहण्यासाठी पाच हजार रुपये पाठवावे लागतील, असे सांगितले. त्यानुसार काळे यांनी पाच हजार रुपये पाठवले. फोटो पाहिल्यानंतर मुलगी पसंत झाली आणि ८ मार्च रोजी घोडेगाव येथील मंदिरात विवाह करण्याचे निश्चित झाले.

लग्नाच्या दिवशी आमिना सय्यद आणि नसिम मुंढे या मुलीला घेऊन मंदिरात आल्या. मात्र, विवाह लावण्यापूर्वी आणखी ३५ हजार रुपये देण्याची मागणी करण्यात आली. त्यानुसार काळे यांनी रोख रक्कम दिली. त्यानंतर हिंदू रीतिरिवाजानुसार विवाह पार पडला. मात्र, विवाहानंतर दुसऱ्याच दिवशी आमिना सय्यद ही नववधूला काळे यांच्या घरातून घेऊन निघून गेल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. याबाबत विचारणा केली असता समाधानकारक उत्तर मिळाले नाही. पैसे परत मागितल्यानंतर नकार देण्यात आला तसेच खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी आमिना जमालुद्दीन सय्यद (रा. कोंढवा, पुणे) आणि नसिम शहाबुद्दीन मुंढे (रा. घोडेगाव, ता. आंबेगाव) यांच्याविरुद्ध घोडेगाव पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

निमगाव खलु दरोड्याचा तपास रखडला

जनता आवाज वृत्तसेवा

श्रीगोंदा : निमगाव खलु येथे झालेल्या रक्तरंजित दरोड्याच्या घटनेला दहा दिवस उलटून गेले, तरी आरोपी पोलिसांच्या हाती लागलेले नाहीत. घरात घुसून दाम्पत्यावर जीवघेणा हल्ला, महिलेचा जागीच मृत्यू आणि पती गंभीर जखमी झाल्याने हादरलेल्या ग्रामस्थांमध्ये आता तपासाच्या गतीबाबत प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत.

४ ऑक्टोबर रोजी घडलेल्या या घटनेत दरोडेखोरांनी घरात प्रवेश करून दाम्पत्यावर हल्ला केला होता. त्यानंतर सुमारे पाच लाख ६० हजार रुपयांचा ऐवज लंपास करण्यात आला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन अहिल्यानगर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा आणि श्रीगोंदा पोलिसांनी तपास हाती घेतला आहे. घटनास्थळी श्वान पथक आणि अंगुली मुद्रातज्ज्ञांची मदत घेण्यात आली होती. मात्र, तपास सुरू होऊन दहा दिवस झाले तरी आरोपींचा ठोस माग लागलेला नाही. त्यामुळे तपासाची दिशा नेमकी कोणती, याबाबत नागरिकांमध्ये चर्चा सुरू झाली आहे.

हल्ल्यामागील हेतूचा उलगडा कधी?

दहा दिवसांनंतरही आरोपी मोकाट

या प्रकरणात दरोडेखोरांनी दाम्पत्यावर इतका गंभीर हल्ला का केला, आरोपींची संख्या किती होती, चोरीला गेलेला ऐवज कुठे आहे, यासह अनेक प्रश्न अद्याप अनुत्तरित आहेत. गावातील शांत वातावरणात घडलेल्या या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अशा गंभीर गुन्ह्याचा लवकर छडा लागणे आणि आरोपींना अटक होणे आवश्यक असल्याची भावना ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत.

तपासातील प्रगती जाहीर करण्याची मागणी

गंभीर गुन्ह्यांतील आरोपींना शोधून काढणे आणि नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास कायम ठेवणे हे तपास यंत्रणेसमोरील मोठे आव्हान आहे. त्यामुळे या प्रकरणात आतापर्यंत झालेल्या तपासाची दिशा, हाती लागलेले धागेदोरे आणि पुढील कारवाईबाबत पोलिसांनी माहिती द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. निमगाव खलु येथील दरोड्याचा छडा लावून आरोपींना जेरबंद करण्यासाठी पोलिस यंत्रणेची कसोटी लागणार आहे.

जाहीर नोटीस

तमाम लोकांना आमचे अशिल विशाल बाबुराव धस, रा.वॉर्ड नं. १. श्रीरामपूर, ता. श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर यांचेतर्फे व करिता या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

आमचे अशिलांचे वडील कै. बाबुराव आप्पासाहेब धस यांचे नांवावर होंडा कंपनीची ॲक्टिव्हा मोटारसायकल नं. एम.एच.१७ बी. क्यू. ६९२९ हिचा चेसीज नं. एम. ई ४ जे.एफ. ५०५ जी.जी.टी. ६२६००८ असा असून इंजिन नं. जे. एफ. ५० ई.टी. ३६२६१५० असा आहे. आमचे अशिलांचे वडील कै. बाबुराव आप्पासाहेब धस हे दि. १२/०४/२०२५ रोजी मयत झाले. त्यांना आमचे अशिल वारस आहे. तरी आमचे अशिल त्यांचे वारस नाही असे कोणाचेही म्हणणे असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत तशी लेखी हरकत योग्य त्या कागदपत्रासह निदर्शनांस आणून द्यावी. नाहीपेक्षा सदर जाहीर नोटीसीवरून आमचे अशिल सदर वाहन आर.टी.ओ. कार्यालयात त्याकामी योग्य ती कार्यवाही करून हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण करतील व मग त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

करीता ही जाहीर नोटीस दिली असे.

श्रीरामपूर, ता. १४/१०/२०२६

सही/-
अशिलांतर्फे ॲडव्होकेट
ॲड.पंकज ब.औताडे
जित प्लाझा, पहिला मजला, लोकमान्य टिळक वाचनालयासमोर, मेनरोड, श्रीरामपूर, ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर

सही/-
अशिल
विशाल बाबुराव धस

'आठवणीतले दादा'तून अजित पवारांच्या कार्याला उजाळा

जनता आवाज वृत्तसेवा

मुंबई : दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जीवनप्रवासातील आठवणी, प्रशासकीय कारकीर्द आणि सम ाजासाठी दिलेल्या योगदानाचा वेध घेणाऱ्या 'आठवणीतले दादा' या पुस्तकाचे अनावरण बुधवारी मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले.



अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमात त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा आणि सहवासातील आठवणींचा पट उलगडणाऱ्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. कोपरगावचे आमदार आशुतोष काळे यांच्या संकल्पनेतून आणि देवळाली प्रवरा येथील गणेश अंबिलवादे यांच्या संपादनातून हे पुस्तक साकारण्यात आले आहे. पुस्तक अनावरणप्रसंगी सुनेत्रा पवार भावुक झाल्या. त्या म्हणाल्या, ''अजितदादांचा जीवनप्रवास, त्यांच्या आठवणी, प्रशासकीय कारकीर्द आणि त्यांनी सम ाजासाठी दिलेले योगदान या पुस्तकातून समोर आले आहे. त्यांच्या सहवासातील अनेक आठवणी आणि कार्याचा प्रवास पुन्हा एकदा वाचकांसमोर आला आहे. दादांच्या आठवणी अशा स्वरूपात जतन होत आहेत, ही माझ्यासाठी अत्यंत भावनिक बाब आहे.''

अजित पवार यांनी सार्वजनिक जीवनात घेतलेले निर्णय, प्रशासनातील योगदान आणि जनतेशी असलेला संवाद यांचा मागोवा या पुस्तकातून घेण्यात आला आहे. त्यांच्या कार्याचा दस्तऐवज म्हणून हे पुस्तक महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या कार्यक्रमास मंत्री छगन भुजबळ, हसन मुश्रीफ, दत्ता भरणे, बाबासाहेब पाटील, नरहरी झिरवळ, तसेच श्रीकांत जाधव, सागर भालेराव, म हेश गिरमे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

अजितदादांच्या आठवणींचा ठेवा

'आठवणीतले दादा' या पुस्तकाच्या माध्यमातून अजित पवार यांच्या राजकीय प्रवासातील विविध प्रसंग, त्यांच्या कार्यशैलीच्या आठवणी आणि समाजासाठी केलेल्या कामांचा ठेवा जतन करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. हे पुस्तक अजित पवार यांच्या कार्याचा अभ्यास करणाऱ्या वाचकांसाठी उपयुक्त ठरणार आहे.

श्रीगोंद्याच्या कन्यांची क्रीडा भरारी



कुस्ती, थाय किक बॉक्सिंगमध्ये सुवर्ण यश

मुलींच्या क्रीडा क्षमतेला मिळाले व्यासपीठ

शालेय स्तरावरच कुस्ती आणि थाय किक बॉक्सिंगसारख्या कठीण क्रीडा प्रकारांत विद्यार्थिनींनी मिळविलेले यश हे त्यांच्या आत्मविश्वासाचे आणि मेहनतीचे प्रतीक ठरले आहे. तेजस्विनी गिरमकरच्या राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेतील कामगिरीकडे आता श्रीगोंदा परिसरातील क्रीडाप्रेमींचे लक्ष लागले आहे.

जनता आवाज वृत्तसेवा

लिंपणगाव : क्रीडा क्षेत्रात श्रीगोंद्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारी कामगिरी रयत शिक्षण संस्थेच्या श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी केली आहे. राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत तेजस्विनी श्रीधर गिरमकर हिने सुवर्णपदक पटकावत राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली, तर श्रावणी सोलनकर हिने रौप्यपदकाची कमाई केली. याचबरोबर गोवा येथे झालेल्या राष्ट्रीय थाय किक बॉक्सिंग स्पर्धेत वैष्णवी भागवत आणि शर्वरी टकले यांनी सुवर्ण टायटल बेल्ट पटकावत विद्यालयाच्या क्रीडा यशात भर घातली.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद, रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा खोपोली येथील कारमेल कॉन्व्हेंट हायस्कूलच्या क्रीडा संकुलात पार पडल्या. या स्पर्धेत श्रीगोंदा कन्या विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी दमदार कामगिरी करत आपली गुणवत्ता सिद्ध केली. १४ वर्षांखालील वयोगटातील ३० किलो वजन गटात तेजस्विनी श्रीधर गिरमकर हिने प्रतिस्पर्ध्यांवर मात करत सुवर्णपदक पटकावले. या यशामुळे तिची राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ३९ किलो वजन गटात श्रावणी सोलनकर हिने रौप्यपदक मिळवत विद्यालयाच्या यशात मोलाची भर घातली.

कुस्तीबरोबरच थाय किक बॉक्सिंगमध्येही विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय काम गिरी केली. गोवा येथे झालेल्या राष्ट्रीय थाय किक बॉक्सिंग स्पर्धेत वैष्णवी भागवत आणि शर्वरी टकले यांनी सुवर्ण टायटल बेल्ट पटकावला. कठोर सराव, आत्मविश्वास आणि जिद्दीच्या जोरावर या विद्यार्थिनींनी राष्ट्रीय स्तरावर विद्यालयाचा नावलौकिक वाढविला. एकाच विद्यालयातील विद्यार्थिनींनी दोन वेगवेगळ्या क्रीडा प्रकारांत राष्ट्रीय आणि राज्यस्तरावर मिळविलेले यश विशेष कौतुकास्पद ठरले आहे. विद्यार्थिनींची मेहनत, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि विद्यालयाने उपलब्ध करून दिलेले क्रीडापूरक वातावरण यामुळे ही यशस्वी वाटचाल शक्य झाली.

या यशाबद्दल गुणवंत विद्यार्थिनी, त्यांचे पालक आणि मार्गदर्शकांचा सन्मान करण्यात आला. रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य बाबासाहेब भोस, जनरल बॉडी सदस्य कुंडलिकराव दरेकर, गणेश भोस, स्कूल कमिटीच्या रत्नप्रभा बोरुडे आणि पिटर रणसिंग यांच्या हस्ते विद्यार्थिनींचा गौरव करण्यात आला. विद्यार्थिनींना विद्यालयाचे क्रीडा विभाग प्रमुख किरण कोकणी, बुद्धभूषण साळवे, कुस्ती प्रशिक्षक मेजर फंड तसेच थाय किक बॉक्सिंगचे ग्रँडमास्टर समीर पांढरकर यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका वर्षा भोईटे, पर्यवेक्षक बाळासाहेब शिंदे, गुरुकुलप्रमुख किरण शिंदे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



पैठणीची भाग्यवान विजेती !
प्रतिक्षा निमसे
उक्कलगाव

दैनिक
जनता आवाज

अहिल्यानगर, गुरूवार, दि. १५ ऑक्टोबर २०२६, पान नं. ८



सोन्याची नथ भाग्यवान! विजेती
सुप्रिया मोरगे
श्रीरामपूर

शारदीय नवरात्रौत्सव-२०२६

नवरात्रौत्सव - २०२६ मध्ये चौथ्या दिवशी जिल्ह्यातून हजारो नवदुर्गाचा उत्स्फुर्त प्रतिसाद



आम्ही मैत्रिणी, अहिल्यानगर



शताक्षी ग्रुप, कोपरगाव



श्री रेणुका माता ग्रुप, चांदवड



शिवाकुंर विद्यालय कोंढवड शिक्षक ग्रुप, राहुरी



श्री शक्ती महिला मंडळ, लोणी



स्मिता उंडे (अहिल्यानगर)



स्वाती मुंदडा (कोल्हार)



साधना शिरसाठ (राहुरी)



वैशाली जाधव (कोल्हार)



जया मुसंडे (नाशिक)



निर्मला फड (कोपरगाव)



अनिता गायकवाड (कोपरगाव



छाया मोरगे (श्रीरामपूर)



नम्रता सोडणार (अहिल्यानगर)



सोनाली पटारे (राहुरी)



मयुरी महाडिक (पुणे)



प्रियांका राऊत (कोल्हार)



आशा कोबरणे गणेगाव (ता. राहुरी)



गाथा महाडिक (पुणे)



तृप्ती वायकर (एकरूखे)



माधुरी फुगे (कोपरगाव)



पूजा कांबळे-चव्हाण (श्रीरामपूर)



वैष्णवी बुचुडे (हनमंतगाव)



स्मिता घुले (संगमनेर)



सविता कदम (कोल्हार)



छाया सुराळकर येसगाव (कोपरगाव)



सुजाता बनसोड (श्रीरामपूर)

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ RNI No. MAHMAR/2022/85155. This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028, RNI No. MAHMAR/2022/85155.